

शुक्रवार, ५ मे २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२३९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●FRIDAY 5 MAY 2023 | adhunikkesari.com Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-239 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5


# उपऱ्यांच्या सुपाऱ्या कुणी घेतल्या : उद्धव ठाकरे


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : रत्नागिरी जिल्ह्यातील बारसू येथील जमिनी सगळ्या उपऱ्यांनी विकत घेतल्या आहेत. मग त्या उपऱ्यांची सुपारी घेऊन तुम्ही माझ्याशी लढायला येत आहात? माझ्या भूमिपुत्रांवर मी अन्याय होऊ देणार नाही. माझ्या भूमिपुत्रांच्या घरादारांवर उपऱ्यांचा वरवंटा तुम्हाला फिरवायचा आहे का? पोलिसांचे बळ का वापरत आहात? लोकांमध्ये जा, त्यांच्या प्रश्नांना उत्तर द्या. एवढेच विचारतो आहे की कुणी कुणाच्या सुपाऱ्या घेतल्या आहेत, असा सवाल करत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे राज्य सरकार व भाजपवर हल्लाबोल केला.**

यावेळी पुढे बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, मी मुख्यमंत्री असताना जे प्रकल्प महाराष्ट्रात येणार होते ते तुमची सत्ता आल्यानंतर गुजरातला का गेले? एवढेच नाही तर प्रकल्पाच्या मुद्द्यावर महाराष्ट्रात राख आणि गुजरातमध्ये रांगोळी असे का? असा आक्रमक प्रश्नही त्यांनी भाजपाला विचारला आहे. बारसूचा प्रकल्प करण्यासाठी मी पत्र दिले होते ही वस्तुस्थिती आहे. पण लोकांची संमती असली तर हा प्रकल्प तिथे करायला हरकत नव्हती. आज तिथे लोकांच्या मनात शंका आहेत, प्रश्न आहेत त्यांची उत्तरे दिली गेली पाहिजेत, असेही उद्धव ठाकरे म्हणाले. नाणार मध्ये हा प्रकल्प रद्द होणार होता. मात्र तो रद्द झाला त्यानंतर ध्यानीमनी नसताना मी मुख्यमंत्री झालो. एकनाथ शिंदेंनी माझ्याकडे आग्रह धरला होता की हा प्रकल्प झाला पाहिजे. रिफायनरीमुळे होणारे प्रदूषण हे मला महाराष्ट्रात मान्य नाही असे मी म्हटले होते. पण त्याचवेळी मी जाहीर केले होते की जिथे हा प्रकल्प स्वागत होत असेल तर तिकडे हा प्रकल्प घेऊन जावा. आमचे सरकार यांनी पाडल्यानंतर मागच्या सहा ते आठ महिन्यांत महाराष्ट्रात येणारे चांगले प्रकल्प मग ते वेदांता फॉक्सकॉन किंवा इतर प्रकल्प हे सगळे गुजरातला वळवले. जे मी




नाणारच्या वेळी बोललो होतो तेच माझे मत आजही ठाम आहे की केवळ माझे पत्र घेऊन नाचवत आहात मग माझ्याच काळात येणारे प्रकल्प तुम्ही गुजरातला का जाऊ दिले? महाराष्ट्रात राख आणि गुजरातमध्ये रांगोळी हे तुम्हाला करायचे आहे का? असा प्रश्न विचारत उद्धव ठाकरेंनी या प्रकरणावर ताशेरे झाडले आहेत. प्रकल्प चांगला असेल तर लोकांसमोर त्या प्रकल्पाचे सादरीकरण करा. एक तर लोकांचे गैरसमज दूर करा किंवा प्रकल्प दूर करा. लोकांच्या डोक्यावर बंदुक टेकवून तुम्ही संमती घेत आहात आणि प्रकल्प चांगला आहे, असे सांगत आहात. याला काय अर्थ आहे?



**बारसूसाठी तेव्हा दबाव वगैरे काहीही नव्हता** : बारसूसाठी माझ्यावर दबाव वगैरे अजिबात नव्हता. मला वाटले होते की जर प्रकल्प चांगला असेल आणि तिथल्या लोकांनी होकार दिला तर ती तयारी दर्शवली होती. मात्र आता जसे मला दिसते आहे त्यात लोकांच्या मनात शंका आणि प्रश्न आहेत. त्या प्रश्नांना उत्तरे दिली पाहिजेत. आपल्याकडे सध्या असे झाले की प्रश्न विचारले की नामशेष करायचे असे चालत नाही. बारसूच्या लोकांना त्यांची उत्तरे मिळालीच पाहिजेत तो त्यांचा हक्क आहे, असेही उद्धव ठाकरे म्हणाले आहे.






# बजरंग दलावर बंदी म्हणजे देशद्रोह्यांना साथ

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बेळगावात पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर

आधुनिक केसरी न्यूज

**बेळगाव :** बजरंग दलसारख्या राष्ट्रभक्त संघटनेवर बंदीची मागणी करणे म्हणजे एकप्रकारे देशद्रोह्यांनाच साथ देण्यासारखे आहे, असे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. बेळगाव येथे पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना ते बोलत होते. भाजपा हा राष्ट्रीय पक्ष आहे. यापूर्वीही लोकसभेच्या निवडणुकीत मी बेळगाव येथे प्रचाराला आलो होतो. विलासराव देशमुख हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना कर्नाटकात प्रभारी होते. तेही सर्वत्र फिरले आहेत. मी स्वतः मराठी भाषिकांच्या मागे उभा आहे आणि आमचा पक्ष सुद्धा ठामपणे उभा आहे. संजय राऊतांनी काँग्रेसची दलाली करणे सोडले, तर मला कर्नाटकात जाण्याची गरज पडली नसती. संजय राऊत यांच्या गटाचा काँग्रेस हा मित्रपक्ष आहे. त्यांनी आपल्या मित्रपक्षाला प्रचार कुठे करा आणि कुठे करु नका, याबाबत सांगितले नाही. कारण, ते येथे काँग्रेसची दलाली करण्यासाठी आले होते, असेही फडणवीस म्हणाले.

बेळगावातील प्रचार सभांमध्ये बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बेळगावात आणि कर्नाटकातही कमळच फुललेले दिसेल. गेल्या 9 वर्षांत देशात मोठे परिवर्तन झाले आहे. गरिबांसाठी दिल्लीतून जाणारा प्रत्येक पैसा पूर्णपणे गरिबांच्या खात्यात जात आहे. दलाली आणि मध्यस्थांची संपूर्ण यंत्रणा संपविण्याचे काम मोदीजींनी केले. भारताला जगातील पाचव्या क्रमाकांची अर्थव्यवस्था बनविण्याचे काम मोदीजींनी केले. मूठभर लोकांच्या तिजोरीत असलेला पैसा देशाच्या तिजोरीत आल्याबरोबर देशात झालेले परिवर्तन तुम्ही अनुभवत आहात.

जागतिक पातळीवर सुद्धा भारताची ताकद निर्माण करण्याचे काम नरेंद्र मोदीजी यांनी केले आहे. 370 कलम रद्द करुन देशाला सुरक्षित करण्याचे काम नरेंद्र मोदी यांनी केले. विरोधी पक्षांनी फक्त




एकच काम केले, ते म्हणजे त्यांच्या सरकारांनी मोदीजींच्या योजना लोकांपर्यंत पोहोचू दिल्या नाहीत. कर्नाटकात काँग्रेसचा मुख्यमंत्री होणार नाही, तरीही काँग्रेस नेते मुख्यमंत्रीपदासाठी भांडत आहेत. बजरंग दलावर बंदी टाकायची कुणाच्या बापाची हिंमत नाही. डोक्याला गंध लागले तर ते पुसायचा अट्टाहास काँग्रेसच्या अध्यक्षांकडून केला जातो. काँग्रेसच्या सत्तेच्या मनसुब्यांना आग लावण्याचे काम मतांच्या रूपाने तुम्हाला करावे लागेल. रामाच्या अस्तित्त्वावर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्यांना त्यांची जागा दाखविण्याची ही वेळ आहे. आमची संस्कृती, भारतमाता, प्रभू श्रीराम ही आमची अस्मिता आहे. त्यावर कुणी प्रश्नचिन्ह निर्माण करीत असेल तर त्यांना त्यांची जागा दाखविण्याची हीच खरी वेळ आहे, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# तुम्हाला विश्वासात घेऊन निर्णय घ्यायचा होता पण...


## शरद पवार : वाय. बी. सेंटर बाहेर आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांशी संवाद

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे अध्यक्ष पदावरून पायउतार झाले आहेत. त्यांनी 'लोक माझा सांगाती' या आपल्या पुस्तकाच्या सुधारीत आवृत्तीच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमात अचानक आपली निवृत्ती जाहीर केली. शरद पवारांच्या या निर्णयामुळे अनेकांना धक्का बसला आहे. शरद पवारांनी राजीनामा मागे घ्यावा, यासाठी कार्यकर्त्यांनी आंदोलन सुरू केले आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अस्थिरता निर्माण झाली आहे. दरम्यान, शरद पवार यांनी वाय. बी. सेंटर बाहेर आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला आहे. यावेळी शरद पवार म्हणाले, राजीनामा देण्याआधी मी तुमच्याशी चर्चा केली असती, तर मला खात्री होती की तुम्ही मला होय म्हणाले नसता. हा जो निर्णय घेतला आहे, त्यावर राज्याबाहेरील लोकांबरोबर उद्या बैठक होईल. त्यानंतर एक ते दोन दिवसांत अंतिम निर्णय सांगू. दोन दिवसानंतर तुम्हाला असे बसावे लागणार नाही, असे सूचक वक्तव्य शरद पवार यांनी केले आहे. वाय बी सेंटरबाहेर कार्यकर्त्यांशी संवाद साधताना शरद पवार म्हणाले, असा निर्णय घेण्याआधी सहकार्यांशी चर्चा करणं आवश्यक असते, पण मला खात्री होती, तुम्ही मला 'होय' म्हणाले नसता. तुम्हाला विश्वासात घेऊन निर्णय घ्यायची आवश्यकता होती, पण त्यावेळी मी तुम्हाला विश्वासात घेतले नाही. त्यामागे माझा हेतू काय होता? हे मी तुम्हाला सांगितले आहे. मी राजीनाम्याचा निर्णय घेतल्यानंतर महाराष्ट्राबाहेरून तुमचे अनेक सहकारी इथे आले आहेत. उद्या माझ्याशी त्यांना बोलायचे. उद्या संध्याकाळपर्यंत माझी त्यांच्याबरोबर बैठक होईल. त्यानंतर तुमच्या सगळ्यांची भावना नजरेसमोर ठेऊन आणि बाहेरून आलेल्या सहकार्यांना विश्वासात घेऊन येत्या एक ते दोन दिवसांत अंतिम भूमिका घेऊ. पण ती भूमिका घेताना कार्यकर्त्यांच्या मनातील भावना दुर्लक्षित केली जाणार नाही, एवढेच याठिकाणी सांगतो. दोन दिवसानंतर तुम्हाला असे बसावे लागणार नाही, याची खात्री देतो, असेही शरद पवार यावेळी म्हणाले.






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# सिंगापूरचा भाग्यविधाता - ली क्वान यू

वाऱ्याचा वेग, चेंडूचे वजन, बॅटच्या फटक्यांचा जोर या सगळ्यांचा अंदाज घेऊन चेंडू टोलवावा लागतो. कुशल खेळाडू हे सरावामुळे सहज करू शकतो. ली यांच्यावर असलेली सिंगापूरची जबाबदारी काहीशी या खेळासारखीच नव्हती का ? सगळ्या गोष्टींचा अंदाज घेऊनच त्यांना हा चेंडू टोलवावा लागणार होता. त्यांना सिंगापूरला मानाचे स्थान प्राप्त करून द्यायचे होते. ली म्हणजे सिंगापूरला लाभलेला एक आगळावेगळा असा पंतप्रधान होता. सतत नवनवीन गोष्टी शिकून घेऊन स्वतःला अद्ययावत ठेवणे हा ली यांचा स्वभाव होता. ली यांनी अशीच एक आगळीवेगळी गोष्ट केली. त्यांनी सिंगापूरच्या पंतप्रधानपदाची जबाबदारी सांभाळत असतानाच १९६८ मध्ये अमेरिकेतील सुप्रसिद्ध हार्वर्ड बिझिनेस स्कुलमध्ये व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम शिकण्यासाठी प्रवेश घेतला. पंतप्रधान पदावर कार्यरत असताना जगातील कोणत्याही पंतप्रधानाने यापूर्वी असे केले नव्हते. या मॅनेजमेंटच्या अभ्यासाचा उपयोग त्यांना सिंगापूरचे व्यवस्थापन उत्तम प्रकारे करण्यासाठी आणि सिंगापूरला प्रगतीपथावर नेण्यासाठी झाला. सिंगापूरमध्ये कमालीची विषमता होती. केवळ काही मोजक्याच लोकांजवळ स्वतःची घरे होती. ज्यांच्या हाती उद्योग आणि संपत्ती केंद्रित झाली होती, अशा लोकांजवळ भरपूर पैसे, स्वतःची प्रशस्त घरे होती. बहुसंख्य जनता झोपडीतच राहत होती. अवतीभवती घाणीचं साम्राज्य होतं. लोकांना उद्योगधंदा नव्हता. तसे लोक मेहनती पण त्यांना रोजगार उपलब्ध नव्हता. ली आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या झोपडपट्टीत राहणाऱ्या आणि कामगार वर्गाला स्वतःची घरे मिळवून द्यायची योजना आखली. त्यासाठी हौसिंग डेव्हलपमेंट बोर्ड स्थापन केले. अत्यंत कमी किमतीत गरीब जनतेला सुंदर आणि आवश्यक सुखसोयींनी युक्त अशी घरे बांधून दिली. अशा रीतीने झोपडपट्टीचा प्रश्न निकाली काढला. पण लोकांना अजून स्वच्छता, आरोग्याचे महत्व पटले नव्हते. त्यांच्या मंत्रिमंडळाने यासाठी अत्यंत कडक कायद्यांची तरतूद केली. लोकांचे प्रबोधन करणे आणि नियमांचे उल्लंघन केल्यास कडक शिक्षा वा दंड करणे अशी दुहेरी पद्धत त्यांनी अवलंबली.



## आनंदी पहाट

# तेजोमय किरणांनी आयुष्य उजळून निघावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्या आयुष्यात अथवा इतरत्र काय घडलंय, हे आपल्याला माहिती असतंच किंवा ते कालांतरानं माहिती होतंच. कालची, भूतकाळातील माहिती आपल्या सर्वांनाच उपलब्ध होत असते. वर्तमानात राहून भूतकाळातल्या अनुभवांबरोबर सतत राहणं हे नेहमीच उपयोगाचं ठरतं असं नाही. प्राप्त परिस्थितीत काहीवेळा उपलब्ध झालेल्या अनेक चांगल्या संधी आपण गमावू शकतो. ह्याचं नुसतं ज्ञान असून चालत नाही तर त्या संधीचं सोनं करण्याचं भान आपल्याला असणं आवश्यक असतं. अनेकदा आपल्या गत आयुष्यातील अनेक बाबींची सांगड, बरोबरी, तुलना आपण प्राप्त आणि सद्यःस्थितीशी करत असतो. चांगलं-वाईट, चूक-बरोबर, खरं-खोटं अशा अनेक समस्या आपल्याला भेडसावत राहतात. अशावेळी, आनंद तर नाहीच पण दुःख आणि निराशा पदरी येते. मग आपण दोष मात्र आपल्या नशिबाला नाहीतर परमेश्वरालाच देत राहतो. अनेकदा नकारात्मक विचारच आपलं नुकसान करतात. येणाऱ्या अनेक विचारांमध्ये नकारात्मक विचार आपल्याकडून अनावधानानं आपलेसे केले जातात. ह्या नकारात्मक विचारांचा पगडा आपल्या अंतर्मनावर अधिक बसला तर त्याचे परिणाम विपरीत होत असल्याचं अनुभवायला येऊ लागतं. कालचा दिवस संपला तरंच आपल्या आयुष्यातील नवीन दिवसाची पहाट उगवते. नवीन दिवसाच्या उगवत्या सूर्याच्या तेजोमय किरणांनी आपलं नवं आयुष्यच जणू काही सुरु होत असतं. दिवसाची सुरुवातच सकारात्मक विचारांनी झाली तर पुढील दिवस उजाडेपर्यंत आपण आनंदी, सुखी, समाधानी तर राहू शकतोच पण शिवाय मनःशांती अधिक प्राप्त होत राहते. हल्ली जगात पैशानं काहीही विकत घेता येतं आणि विकताही येतं. असं जरी असलं तरीही मनःशांती मात्र आपल्या अंतरंगात प्रसूत व्हावी लागते. आपल्या आंतच आपण स्वतः आनंदाची निर्मिती करायची असते.



आधुनिक केसरी

**अभंगात माझे | प्राण गुंतो ||**
भजनात गातो | गुण आम्ही तुझे ||
वैकुंठाचे राजे | अभंगात ||१||
रमलो संसारी | पडला विसर ||
दुःखाचा कहर | कळो आला ||२||
धावले हे मन | पंढरीच्या वाटे ||
संत मेळा भेटे | परमानंद ||३||
दारी तुझ्या आलो | सोडोनिया गाठी ||
प्रारब्धाच्या भेटी | भाग्यवंता ||४||
वैष्णवांचा संग | पुण्यवंता लाभे ||
ज्ञानवंत शोभे | ज्ञाना-तुका ||५||
भरूनी पावलो | नको काही दुजे ||
अभंगात माझे | प्राण गुंतो ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**वार्ताल्पापि करोत्येव
सुखं श्रेष्ठं नृणां यदि।
जानीयात् सुजनं तं वै
सर्वोपकारणे क्षमः ।।२।।
ज्याच्याशी थोडे बोलणे सुद्धा
माणसांना श्रेष्ठसुखकारक असते,
त्याला खरोखर उपकार करण्यास
सक्षम असा भला माणूस जाणावे.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**सुख कारण तत्त्व ज्ञान है,
सुख कारण विधि कर्म ।
सुख का कारण धर्म है, सुख पुरुषारत मर्म
।।४७।। (पंचम मण्डल एकादश अध्याय)
०५/११/४७
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
सुखाचं कारण तत्वज्ञान आहे. सुखाचं कारण शास्त्रविहित कर्म आहे. सुखाचं कारण धर्म आहे. ज्ञानयुक्त पुरूषार्थाद्वारेच सर्व सुखं प्राप्त होतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## सूक्ष्म आशंका निरुपण

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

सोने काय किंवा मौल्यवान वस्तू काय या सर्व आपण ऊदा साठी घेतल्या आहेतमाया निर्गुण निराकार आहे . माया खरी नाही ती ब्रम्हस्वरूपातचं कशी निर्माण झाली. हे पहाता माया ही निर्गुणाने निर्माण केली आहे. असा साधा ढोबळ अर्थ आपण काढू शकतो. हे जग निर्माण करणारा कर्ता मुळात निराकार आहे, आणि त्याने ही जीवसृष्टी निर्माण केली तोच निराकार आहे. आणि त्याने निर्माण केलेले जग हे विलक्षण आहे .

# संतांच्या संगतीचा परिणाम

आधुनिक केसरी

जडीबुटीवाल्याजवळ एक गोळी असते. ज्याच्या अंगात विष भिनले आहे अशा माणसाच्या जखमेवर ती गोळी नुसती ठेवतात. ती सर्व विष शोषून घेते. नंतर तिला धुतली की ती पूर्ववत् होते. त्याचप्रमाणे सत्पुरुषाच्या संगतीत आपले पाप शोषून घेतले जाते, आणि पुनः तो सत्पुरुष स्वतः शुद्धच राहतो. सत्संगती मिळेल, पण ती टिकणे फार कठीण काम आहे. साधारणपणे ज्या विषयाची आपल्याला आवड असते तसलीच संगत आपण बघतो. मीच वाईट म्हणून मी वाईट लोकांची संगत धरतो. विषयात दोष नाही; म्हणजेच, नुसते विषय बाधक होत नाहीत, विषयी लोकांची संगत मात्र फार बाधक असते. संगतीने आपल्यावर बरावाईट परिणाम होतो. विषय मागूनही जो ते देत नाही, त्यांपासून परावृत्त करतो, तो संत. विषयतृप्तीसाठी जावे आणि निर्विषय होऊन यावे, हा संतसंगतीचा परिणाम. ज्याची संगत केली असताना भगवत्प्रेम प्रकट होते तो संत जाणावा. अशांची संगती केव्हा होईल ही तळमळ असावी. विषयाची गोडी फार; पण तो सुटावा असे वाटू लागले म्हणजे



भजनपूजन करणाऱ्याची संगत धरावी. वाईट विचार मनात आले की नामाची जोड ठेवावी. आपला सर्वाठायी भगवद्भाव वाढू लागला म्हणजे संतांची प्रचीती येते. भगवंताच्या लीला पाहणाऱ्यांनाच खरा आनंद मिळतो. म्हणून संत नेहमी भगवंताविषयीच सांगत असतात. ते जे गातील तो संगीतातला रागच समजावा. तुकारामबुवा नुसते 'विठ्ठल विठ्ठल' म्हणत, पण त्याची गोडी आपल्या गाण्यामध्ये देखील नाही. खरोखर संतांना आपल्याविषयी इतकी कळकळ असते, आपल्याला ती कळतही नाही. संत आपल्या हिताचे सांगतात, पण आपले मन विषयात वावरत असल्याने त्यांचे बोलणे आपल्या मनात पूर्णपणे ठसत नाही. औषध कडू असले तरी रोग झाल्यावर आपण ते घेतोच ना ? मग प्रपंचातल्या व्याधींनी त्रस्त होऊनही आपण संतांच्या हितकारक बोलण्याकडे का दुर्लक्ष करावे ? ज्याला भगवंताचे अधिष्ठान आहे त्याचे कडक बोलणेसुद्धा कुणाला लागणार नाही. अत्यंत निर्भयता हा संतांचा पहिला गुण आहे, कारण 'सर्व ठिकाणी मीच आहे' ही भावना झाल्यावर भयाचे कारणच उरत नाही. आईपण जसे सगळीकडे सारखे, त्याचप्रमाणे सर्व संत एकच भाषा बोलतात. संतांनी मिळवलेले पद मिळविण्याचे साधन आपणही करतो; पण त्यांचे करणे निःसंशय असते, तर उलट आपण नेहमी शंकाच व्यक्त करीत असतो. डोळ्यांत खुपणारा खडा काढण्यासाठी त्यात लोणी घालतात; त्याने न खुपता खडा बाहेर पडतो आणि डोळा थंड होतो. त्याचप्रमाणे संतांची वाणी गोड, मऊ, हितकारक असते; तसे आपण बोलावे. **आजचे बोधवचन आहे -आपली भूमिका थोडी तयार असल्यास सत्संगतीचा परिणाम होण्यास वेळ लागत नाही.**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**तुका म्हणे पाप । गेलें गेल्या कळे ताप ॥३॥
घेऊनियां चक्र गदा । हा चि धंदा करी तो ॥१॥
भक्ता राखे पायापासीं । दुर्जनासी संहारी ॥ध्रु.॥
अव्यक्त तें आकारलें । रूपा आलें गुणवंत ॥२॥
तुका म्हणे पुरवी इच्छा । जया तैसा विठ्ठल ॥३॥**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

**द्राक्षा ग्लानमुखी जाता शर्करा चाश्मतां गता ।
सुभाषितरसस्याग्रे सुधा भीता दिवं गता ॥
स्पष्टीकरण - सर्व गोड पदार्थात सुभाषिताची गोडी अवीट आहे. सुभाषित जिभेला नव्हे, तर मनाला चव देते. सुभाषितात जीवनातले एखादे तत्व मोजक्या शब्दात ठसठशीतपणे सांगितलेले असते. म्हणून ते हृदयाला भिडते आणि जिभेवरही तरळते. व्यावहारिक नीतीचे पाठ या सुभाषितांकडूनच घ्यावे.**

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, ५ मे २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari







# गोकुळसिंग राजपूत यांना सत्यशोधक दर्पणच्या वतीने उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार यांना दि.३०/४/२३ ला डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र छत्रपती संभाजीनगर येथे मुख्य संपादक समाधान वाणी, उपसंपादक उमेश नेमाडे, सहसंपादक गोकुळसिंग राजपूत साप्ताहिक सत्यशोधक दर्पण परिवाराकडून सत्यशोधक वर्धापन दिनानिमित्त हा समाज गौरव, राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आला. नेहमीच शेतकरी यांच्या प्रश्न व समस्या सरकारी दरबारी मांडणारे शेतकऱ्यांना हक्कचे अनुदान मिळवुन देणारे पत्रकार ,ग्रामीण भागातील सर्व सामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी व आपल्या लेखणीतून सत्य जगासमोर आण्याची दमख असणारे लोकप्रिय पत्रकार व सर्वसामान्य नागरिकांना आपल्या हक्काचे सरकारी कायदा व नियम यांचे मार्गदर्शन करणारे पत्रकार म्हणून त्यांची सोयगाव तालुक्यात त्यांची ऑलख निर्माण केली आहे अश्या कामाची दखल घेत व चांगल्या लेखना बद्धल व प्रशासनात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्याना हा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार देऊन गौरविण्यात आले या पुरस्कार सोहळ्याचे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.बाळासाहेब वाल्हेकर संचालक बिवेल्स डिफेन्स अकॅडमी, उद्घाघाटक : जयश्री सोनकवडे उपायुक्त समाज कल्याण व डॉ संजय राठोड ( अधिष्ठाताः शासकीय महाविद्यालय व घाटी, श्रीमती नंदा गायकवाड उपायुक्त मनपा संभाजीनगर,इंजी मधुसूदन कांडलीकर कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग जालना, शिवाजी विद्यालयाचे प्राचार्य नारायण कोलते पाटील सावळदबारा,मा.भीमराव नाडे अधिक्षक सीजीएसटी संभाजीनगर उपस्थित होते.

या पुरस्काराचे अध्यक्ष डॉ संजय राठोड यांच्या हस्ते क्रांतीसुर्य महात्मा फुले डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त व सत्यशोधक दर्पण वर्धापन दिनानिमित्त जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार यांना प्रदान करण्यात त्यांना शाल श्रीफळ, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी विविध क्षेत्रातील अधिकारी व पत्रकार,मान्यवर उपस्थित होते याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी गोकुळसिंग राजपूत यांना पुढील वाटचालीच्या खूप शुभेच्छा दिल्या.यावेळी परिसरातून फर्दापूर पोलिस ठाण्याचे सपोनि भरत मोरे,प्रा.जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते, सरपंच सुरेश चव्हाण घाणेगाव तांडा,सरपंच शिवाआप्पा चोपडे, उपसरपंच मो आरिफ मो.लुखमान, गणेश खैरे, मुकुंदा मानकर, पत्रकार जब्बार डी तडवी,रहीमखॉन, सुनील चोरमारे, जब्बार एस तडवी, बहादूर चव्हाण, सुनील चव्हाण, दिनेश चोपडे,रहीशखॉन, अरुण पुजारी,शिक्षकवृंद आदीसह शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# राजू शेट्टी यांना आजपासून रत्नागिरी जिल्हाबंदी

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** बारसू प्रकल्पाबाबत सुरू असलेल्या आंदोलनामध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांना रत्नागिरी जिल्हाबंदी आदेश लागू करण्यात आला आहे. रात्री उशिरा रत्नागिरी पोलिसांकडून त्यांना ही नोटीस देण्यात आली आहे. तसेच, बारसू प्रकल्पाबाबत कोणतेही वक्तव्य अथवा सोशल मीडियामध्ये पोस्ट, चित्र अथवा व्हिडीओ प्रदर्शित करण्याबाबतही राजू शेट्टी यांच्यावर बंदी घालण्यात आलेली आहे. बारसू प्रकल्पास शेतकऱ्यांनी तीव्र विरोध केलेला आहे. तरीही शासनाकडून त्याठिकाणी जबरदस्तीने जमिनी संपादित करण्याबाबत व सदर प्रकल्पाच्या जमीन गुणवत्तेबाबतच्या विविध चाचण्या घेण्यात येत आहेत. शेतकऱ्यांवर लाठीहल्ले, अश्रूधुरांचा वापर करून त्यांना सदर ठिकाणावरून हाकलून लावण्यात येत आहे. यामुळे राज्य सरकार व शेतकरी यांच्यामध्ये टोकाचा संघर्ष निर्माण झालेला आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते शेट्टी यांनी या संघर्षामध्ये शेतकऱ्यांच्या बाजूने उडी घेतली असून, त्यांच्या प्रतिनिधींनी त्या ठिकाणी उपस्थित राहून सदर प्रकल्पास विरोध केलेला आहे. दरम्यान रत्नागिरी प्रशासनाने जिल्ह्यामध्ये ३१ मे अखेर राजू शेट्टी यांना जिल्हाबंदीची नोटीस लागू केली असून, यामध्ये त्यांनी सोशल मीडियावरही पोस्ट, चित्र अथवा व्हिडीओ प्रदर्शित करण्याबाबतही राजू शेट्टी यांच्यावर बंदी घातलेली आहे. अशी पोस्ट दिसल्यास गुन्हा दाखल करणार असल्याचे सांगितले आहे. संतप्त झालेल्या शेट्टी यांनी अशा नोटीशींना मी भीक घालत नसून ज्या ठिकाणी शेतकरी संकटात सापडेल त्या ठिकाणी मी त्यांच्यासोबत ठामपणे ऊभा राहणार असल्याचे सांगितले आहे.

लोकशाहीच्या राज्यामध्ये मानवी हक्कावर गदा आणण्याचे काम सरकार करत असून, राज्य सरकार जनरल डायरप्रमाणे वागू लागले आहे. काही मुठभर लोकांच्या हितासाठी सर्वसामान्य शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम करत असल्याची टीका शेट्टी यांनी केली आहे. काल रात्री उशिरा अप्पर जिल्हाधिकारी यांच्यावतीने व जिल्हा पोलीस प्रमुख यांच्यावतीने रत्नागिरी पोलीस दलातील अधिकारी राजू शेट्टी यांच्या निवासस्थानी दाखल होवून त्यांच्या समक्ष ही नोटीस लागू केली आहे.

# प्रतोद अनिल पाटील यांचा आमदारकीचा राजीनामा

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शरद पवार यांच्या निर्णयानंतर राज्यभरातील कार्यकर्ते नेते तीव्र विरोध करत आहेत. अनेकांनी राजीनामा देण्यास सुरुवात केली आहे. अशातच राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रतोद आमदार अनिल पाटील हे राजीनामा देत असल्याचे पत्र शरद पवार यांना दिलेले आहे. शरद पवार यांनी निवृत्तीची घोषणा करताच राष्ट्रवादीमध्ये राजीनामा सत्र सुरू झाल्याने त्यातील एक महत्त्वाचा राजीनामा अनिल पाटील यांचा असल्याचे समोर आले आहे. राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदावरून दूर होत असल्याची घोषणा शरद पवारांनी करताच राष्ट्रवादीमध्ये मोठी खळबळ आलेली आहे. राष्ट्रवादीच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी राजीनामा सत्र सुरू केलेलं आहे. तर आता राष्ट्रवादीचे प्रतोद अनिल पाटील यांनी सुद्धा आमदार पदाचा राजीनामा देत असल्याचे पत्र पवारांना पाठवले. राष्ट्रवादी पक्षातून हा एक मोठा राजीनामा असल्याचे समजते. राष्ट्रवादीचे प्रतोद अनिल पाटील यांनी आपण आमदारकीचा राजीनामा देत असल्याचं पत्र शरद पवार यांना दिलं. काही वेळापूर्वी अनिल पाटील हे सिल्वर ओकवर आले होते आणि त्यांनी शरद पवारांची भेट घेतली. त्यावेळेस आपण शरद पवार यांनी घेतलेली भूमिका मागे घ्यावी, अन्यथा आमदारकीचा राजीनामा देऊन असे पत्र दिले आहे. राज्यामध्ये राष्ट्रवादीचे वेगवेगळे पदाधिकारी हे राजीनामा देत आहेत. राज्यात अनिल पाटील हे राष्ट्रवादीचे आमदार आहेत, तसेच प्रतोद म्हणूनही काम पाहतात. पाटील यांनी आज सिल्वर ओकवर शरद पवार यांची भेट घेत राजीनामा पत्र दिले आहे. मात्र आमदारकीचा राजीनामा हा विधान सभा अध्यक्षांना द्यावा लागतो, मात्र अनिल पाटील यांनी पदाचा राजीनामा देत असल्याचे पत्र शरद पवार यांना दिले आहे. यावेळी अनिल पाटील म्हणाले की, 'आमचे जे काही राजकीय अस्तित्व आहे, शरद पवार यांच्यामुळे आहे, त्यांनी जो काही निर्णय घेतला आहे, त्यामुळे मी हे राजीनाम्याचे पत्र शरद पवार यांना दिले आहे.




# बावनकुळेंचे प्रत्युत्तर!

आधुनिक केसरी

मी पंतप्रधान मोदींच्या विरोधात नाही तर, त्यांच्या हुकूमशाही प्रवृत्तीच्या विरोधात आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी आज झालेल्या पत्रकार परिषदेदरम्यान केली होती. पत्रकार परिषदेदरम्यान केली होती. तसेच कर्नाटक निवडणुकीतील प्रचारावरून त्यांनी पंतप्रधान मोदी यांना लक्ष्य केले होते. दरम्यान, उद्धव ठाकरेंच्या या टीकेला भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. त्यांनी ट्वीट करत यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. हुकूमशाही प्रवृत्तीचे कोण आहे? हे उद्धव ठाकरेंच्या अडीच वर्षांच्या काळात महाराष्ट्राने बघितले आहे. त्यावेळी विरोधात टीका केली म्हणून नारायण राणेंना तुरुंगात जावे लागले होते. कार्टून फॉरवर्ड केले म्हणून निवृत्त अधिकाऱ्याला मारहाण करण्यात आली होती. विरोधात बोलले म्हणून पत्रकाराला घरातून अटक करण्यात आली होती. विरोधात भूमिका घेतली म्हणून एका अभिनेत्रीचे घर तोडण्यात आले होते. याला खरे तर हुकूमशाही म्हणतात. त्यामुळे पंतपप्रधान मोदींना हुकूमशाही प्रवृत्तीचे म्हणण्याआधी थोडा आपल्या मुख्यमंत्रीपदाचा कार्यकाळ आठवा, असं प्रत्युत्तर चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. पुढे बोलताना 'जय बजरंगबली' या नाऱ्यावरून उद्धव ठाकरेंनी केलेल्या टीकेवरही प्रतिक्रिया दिली. आम्हाला 'जय श्रीराम' आणि 'जय बजरंगबली'चा जयघोष करण्याचा अभिमान आहे. काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसल्यापासून उद्धव ठाकरेंना हिंदुत्वाचा विसर पडला आहे. रामनवमी आणि हनुमान जन्मोत्सवाला ते साधे ट्वीटही करू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना 'जय बजरंगबली'चा नारा दिल्यावर दुःख वाटणे साहजिकच आहे. कारण ते आता जनाब ठाकरेंच्या भूमिकेत आहात, असे ते म्हणाले. दरम्यान, आज उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत बारसू प्रकल्प आणि कर्नाटक निवडणुकीवरून पंतप्रधान मोदी आणि भाजपावर जोरदार टीका केली होती. मला बारसूमध्ये जाण्यापासून अडवण्याऐवजी तुम्ही लोकांमध्ये जाऊन त्यांच्या प्रश्नांना उत्तरे द्या. पालघरमध्ये घरात घुसून आदिवासींना बाहेर काढले जाते. ही कोणती लोकशाही आहे? म्हणून मी म्हटले की मी मोदींच्या विरोधात नाही, या हुकुमशाही वृत्तीच्या विरोधात आहे, असे ते म्हणाले होते.

# नवीन विरुद्ध जुनी पेन्शनचा वाद निवडणुकीचा मुद्दा



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**१९ वर्षांपूर्वी केंद्र सरकारने जुन्या पेन्शन प्रणालीच्या जागी नवी पेन्शन योजना म्हणजेच एनपीएस लागू केली होती. ही पेन्शन योजना केंद्र सरकारच्या सशस्त्र सुरक्षा दलांव्यतिरिक्त सर्व कर्मचाऱ्यांना लागू आहे. नंतर ही पेन्शन योजना पश्चिम बंगाल वगळता सर्व राज्यांनी लागू केली. या योजनेंतर्गत निवृत्ती वेतनासाठी निधी निर्माण करण्याची व्यवस्था करण्यात आली, ज्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या पगारातून दहा टक्के रक्कम कपात करायची तसेच त्यात दहा टक्के रक्कम शासनाचे मिळवून एका स्वतंत्र निधीत जमा करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.**

त्या फंडासाठी एक नियामक संस्था तयार करण्यात आली, जी ही रक्कम सरकारी रोख्यांमध्ये आणि काही भांडवली बाजारातील शेअर्स आणि इतर सिक्युरिटीजमध्ये गुंतवते. त्यावर मिळणारा लाभ कर्मचाऱ्यांसाठी ठेवलेल्या वेगळ्या खात्यात जमा केला जातो. कर्मचाऱ्याच्या निवृत्तीनंतर, त्याला या खात्यातून साठ टक्के रक्कम थेट काढता येते आणि उर्वरित चाळीस टक्के रक्कम जीवन विमा महामंडळासह इतर चार कंपन्यांच्या पेन्शन योजनांपैकी एक निवडण्याचा पर्याय दिला जातो. नंतर ती कंपनी कर्मचाऱ्याला त्याच्या ठेवीच्या आधारे निवडलेल्या योजनेअंतर्गत पेन्शनची गणना करून दरमहा पेन्शन देते. ही रक्कम आयुष्यभर स्थिर राहते. तर जुन्या पेन्शन योजनेत कर्मचारी निवृत्तीच्या वेळी पगाराच्या जवळपास निम्मी रक्कम पेन्शन म्हणून मिळते, त्यात सरकारने जाहीर केलेला महागाई भत्ता आणि वेतन आयोगाचा लाभही मिळतो. सध्याच्या दरांनुसार, कर्मचाऱ्याला NPS मध्ये जमा केलेल्या प्रत्येक रु. 1 लाखामागे दरमहा 500 ते 600 रुपये पेन्शन मिळते. अशाप्रकारे या फंडात दहा लाख रुपये जमा झाले तर सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला दरमहा पाच हजार ते सहा हजार रुपये पेन्शन मिळते. समजा, नवीन पेन्शन योजनेंतर्गत गेल्या दहा वर्षांपासून एखाद्या व्यक्तीचे योगदान कापले जात आहे आणि सरकार त्याचे योगदानही एकत्र जमा करत आहे. अशा प्रकारे त्यांच्या पेन्शन फंडात आतापर्यंत सुमारे पंधरा लाख रुपये जमा झाले आहेत आणि त्यांच्या नोकरीची पंधरा वर्षे शिल्लक आहेत, त्यात त्याचे आणखी पंचवीस लाख रुपये जमा होणार आहेत. अशाप्रकारे त्याने एकूण पन्नास लाख रुपयांच्या साठ टक्के रक्कम काढली, तर उर्वरित वीस लाख रुपयांच्या आधारे त्याची पेन्शन सहाशे रुपये प्रति लाख मानल्यास त्याला दर महिन्याला जास्तीत जास्त बारा हजार रुपये पेन्शन मिळेल. जरी त्याने 60 टक्के रक्कम काढली नाही तरी त्याला सुमारे तीस हजार रुपये पेन्शन बसेल, तेही महागाई भत्त्याशिवाय, वेतन आयोगाच्या लाभांशिवाय, आणि वैद्यकीय सुविधांशिवाय! ही रक्कम आयुष्यभर तेवढीच राहील. आजपासून पंधरा वर्षांनंतर एक सामान्य माणूस बारा किंवा तीस हजार रुपयांमध्ये काय करू शकेल, याचा सहज अंदाज बांधता येतो. त्यावेळी महागाई आणखी वाढलेली असणार आहे.

2004 मध्ये जेव्हा ही पेन्शन योजना लागू झाली तेव्हा सुरुवातीला कर्मचाऱ्यांना ती सोयीस्कर आणि आकर्षक वाटली, पण जेव्हा एखादा कर्मचारी मध्येच निवृत्त झाला आणि त्याला किती पेन्शन मिळणार हे कळले तेव्हा मात्र सगळ्यांचे धाबे दणाणले. तेव्हाच त्याला समजले की ही पेन्शन जुन्या पेन्शनशी तुलना करता काहीच नाही. तेव्हा त्याला आपली फसवणूक झाली आहे, याची खात्री झाली. मग हळूहळू या योजनेला विरोध होऊ लागला. केंद्र आणि राज्य सरकारचे कर्मचारी वेळोवेळी निषेध नोंदवू लागले. अनेकवेळा मोठ्या प्रमाणावर नवीन पेन्शन योजनेऐवजी जुनी पेन्शन परत सुरू करण्याची मागणी होऊ लागली. गेल्या दहा वर्षांपासून ही मागणी कोणत्या ना कोणत्या स्वरूपात होत आहे. मात्र केंद्र सरकारने ही मागणी गांभीर्याने घेतली नाही. मोर्चे, आंदोलने यामध्ये मोठ्या संख्येने कर्मचारी सहभागी होऊ लागले.

जुन्या पेन्शनच्या जागी नवीन पेन्शन लागू करण्याचा मुद्दा गेल्या वर्षी चांगलाच पेटला, जेव्हा राजस्थान सरकारने नवीन पेन्शन योजना रद्द केली आणि त्याऐवजी जुनी पेन्शन योजना लागू केली. राजस्थाननंतर छत्तीसगड, झारखंड, हिमाचल प्रदेश आणि पंजाबच्या सरकारनेही जुनी पेन्शन योजना लागू केली. नवीन पेन्शन योजनेचा सुधारित फार्म्युला आंध्र प्रदेशमध्ये लागू आहे. आंध्र सरकारच्या पेन्शन योजनेंतर्गत, जर एखाद्या कर्मचाऱ्याने त्याच्या मूळ वेतनाच्या दहा टक्के रक्कम दरमहा जमा केली, तर राज्य सरकार त्याच्या वतीने दहा टक्के रक्कम जमा करून त्याला निवृत्तीच्या वेळी शेवटच्या पगाराच्या तेहतीस टक्के रक्कम हमी पेन्शन म्हणून देते. कर्मचाऱ्याने दरमहा चौदा टक्के रक्कम जमा केल्यास त्याला चाळीस टक्क्यांपर्यंत हमी पेन्शन मिळू शकते. हे पेन्शन फायदे सध्याच्या NPS पेक्षा बरेच चांगले आहेत.

निवडणुकीचे वर्ष असल्याने अनेक विरोधी पक्ष नवीन पेन्शन योजनेऐवजी जुनी पेन्शन लागू करण्याचे आश्वासन देत आहेत. महाराष्ट्र आणि हरियाणा सरकारनेही जुनी पेन्शन बहाल करण्याचे आश्वासन दिले आहे. महाराष्ट्र शासनाने यासाठी निवृत्त सनदी अधिकारी सुबोध कुमार यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समितीचे 14 मार्च 2023 रोजी गठन केले आहे. केंद्र सरकारवरही या प्रकरणी सतत दबाव वाढत आहे. नवीन पेन्शन योजनेतील शासनाचे योगदान दहा टक्क्यांवरून चौदा टक्के केले, तरीही कर्मचाऱ्यांच्या मागण्या आणि दबाव कमी झालेला नाही. आमदार, खासदार, मंत्री आदींना एनपीएस का लागू होत नाही, असा युक्तिवाद कर्मचाऱ्यांनी केला. ते जितक्या वेळा निवडून येतात तितक्या वेळा त्यांच्या पेन्शनमध्ये आणखी वाढ होत जाते. मग आयुष्याचा सुवर्णकाळ सरकारी सेवेत घालवणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना पेन्शनचा लाभ देण्यात एवढी अनास्था का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. पुढील लोकसभा आणि विविध राज्यांच्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुका लक्षात घेता केंद्र सरकारलाही या प्रश्नाकडे लक्ष देणे भाग पडले आहे. नुकतीच केंद्रीय अर्थमंत्र्यांनी नवी पेन्शन योजना अधिक आकर्षक करण्यासाठी समिती स्थापन करण्याची घोषणा केली आहे. चार सदस्यीय समितीचे स्वरूपही स्पष्ट करण्यात आले आहे. या समितीचे अध्यक्ष वित्त सचिव असतील आणि त्यात आणखी तीन सदस्य असतील ज्यात सचिव, कार्मिक आणि प्रशिक्षण विभाग, विशेष सचिव, वित्त विभाग आणि अध्यक्ष, पेन्शन फंड नियामक आणि विकास प्राधिकरण यांचा समावेश आहे. ही समिती सरकारी कर्मचाऱ्यांच्या पेन्शनमध्ये सुधारणा करण्यासाठी, सध्याच्या राष्ट्रीय पेन्शनच्या व्यवस्थेत आणि संरचनेत बदल करण्याची आवश्यकता दर्शवण्याच्या सूचना देईल. खरं तर सरकारी कर्मचाऱ्यांच्या पेन्शन समस्येवर समाधानकारक तोडगा काढणे आवश्यक आहे. वर्षानुवर्षे सुरू असलेली जुनी पेन्शन योजना ही कल्याणकारी सरकारची सामाजिक सुरक्षेच्या दृष्टिकोनातून खूप चांगली योजना होती. जुनी पेन्शन घेणाऱ्या देशातील बहुतांश सरकारी कर्मचारी वर्गासाठी ही जुनी पेन्शन योजना त्यांच्या 'म्हातारपणाची काठी' आहे. यामुळे त्यांच्यात आत्मनिर्भरता आणि स्वाभिमान निर्माण झाला आहे. सेवानिवृत्त व्यक्ती जेव्हा इतर कोणतेही काम करण्याच्या स्थितीत नसते, तेव्हा त्याला त्याच्या जगण्यासाठी कोणाच्याही समोर हात पसरण्याची गरज नसते, त्यासाठी ही जुनी पेन्शन आवश्यक असते. जुनी पेन्शन देण्याचा सरकारने गांभीर्याने विचार करायला हवा. त्यासाठी अतिरिक्त संसाधने उभारण्यासाठी असे प्रयत्न व्हायला हवेत, ज्यातून सर्वसामान्यांवर बोजा न पडता आवश्यक रकमेची व्यवस्था करता येईल.यामध्ये खूप अडचण येत आल्यास आंध्र प्रदेश सरकारने लागू केलेल्या पेन्शन मॉडेलचा विचार करून तीच योजना अधिक आकर्षक बनवून त्याची अंमलबजावणी करता येईल. एकंदरीत पेन्शनच्या प्रश्नावर समाधानकारक तोडगा काढणे आवश्यक आहे, अन्यथा सार्वत्रिक निवडणुका आणि राज्यांच्या निवडणुकांमध्ये हा मुद्दा राजकीय पक्षांसाठी वादाचा मुद्दा बनू शकतो आणि त्याचा फटका त्यांना सहन करावा लागू शकतो.




# सत्याचा बोध : भगवान गौतम बुद्ध



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**भारता सारख्या खंडप्राय देशाला लाभलेली ऐतिहासिक परंपरा प्राचिन संस्कृती हि एक उपलब्धी असुन, वेगवेगळ्या धर्माचे महान तपस्वी युग पुरुष या देशात होऊन गेले. ज्यांनी जगाला दिशा दिली मानवी जीवन म्हणजे काय ? तर आत्मा अमर असुन शरिर नश्वर आहे. मग क्षणभंगुर असणार हे जीवन समजलं तर अर्थपूर्ण आहे. आणि नाही समजलं तर मग मोह मायेचा बाजार आहे. मोह मायेच्या बाजारात भावनेचा व्यापार मात्र जोरदार चालतो आणि हा व्यापार करत करत आत्मा कधी शरीर त्यागुन निघुन जातो हे लक्षात पण येत नाही. म्हणून योग्य वेळी जाग आलीच पाहिजे. जाग येणं म्हणजे योग्य बोध होणं आयुष्यातील एक क्षण जीवन बदलतो. आणि तो क्षण म्हणजे बोध पण हा क्षण योग्य वेळी समजला पाहिजे. बोध हा आपल्या स्वीकारण्यावर अंवलबुन असतो. ज्याला सत्याचा बोध झाला त्याला बुद्ध होण्यासाठी काहिच अडचण उरत नाही.**

ज्ञानाचा अंथगा महासागर जगाला मानवता दया क्षमा शांती ची शिकवणं देणारे महान युगप्रवर्तक बौद्ध धर्माचे संस्थापक जगद्विख्यात तत्वज्ञानी सिद्धार्थ गौतम बुद्ध यांचा जन्म आजच्या दिवशी इ स पुर्व 564 मध्ये नेपाळ मधील लुंबीनी येथे झाला. पण त्या काळीचा विचार केला तर हा सगळा भुभाग भारताशी भौगोलिक संलग्न होता. आयुष्यातील कोणतीही घटना सहज घडत नाही. त्या साठी एक क्षण महत्वाचा असतो. आणि तो क्षण म्हणजे बोध एकदा बोध झाला कि मग बुद्ध होण्यासाठी काहिच अडचण उरत नाही. जन्म मृत्यु हे कटु सत्य आहे. मृत्यू अटळ असुन तो कोणीही टाळू शकत नाही. तसच मृत्यू वेळ काळ हि पण निश्चित नाही. हेच सत्य आहे. आणि हेच सत्य एकदा समजलं कि महात्मा होण्यासाठी कुठेही जाण्याची आवश्यकता भासत नाही. आपण जिथे आहोत तिथेच त्या क्षणी महात्मा होऊ शकतो. फक्त बोध होण गरजेच असत. जन्म मृत्यु चा बोध समजल्या शिवाय आत्म ज्ञानाचा बोध होत नाही. परंतु एक दिवस सहजपणे आपल्या राजधानी मध्ये राजमहालाच्या बाहेर पडुन नगरीत भ्रमण करत असताना रथावर स्वार सिद्धार्थ गौतम बुद्ध यांना एक अंत्य विलक्षण दृश्य दिसले. ते दृश्य म्हणजे एक व्यक्तिची अंत्य यात्रा निघालेली होती. यात्रेच दृश्य पाहून गौतम बुद्ध यांना प्रश्न पडला कि हा क्षण आपल्या आयुष्यात सुद्धा येईल का आणि त्यांना आपले सोबतचे सहकारी यांनी जे सांगितले ते कटु सत्य म्हणजे झालेला बोध जगातील सर्व श्रेष्ठ तत्वज्ञानी होण्यासाठी आधारभूत ठरलं. माणसाचं जीवन कधी कोणत्या वळणावर बदलेल हे काही निश्चित नसतं पण एकदा का सत्याचा बोध झाला कि मग महात्मा होण्यासाठी वेळ लागत नाही. जीवन उपयोगी पंचशील जगाला समर्पित करताना बौद्ध धर्माची स्थापना करत असताना मानवी जीवन मुल्य व आत्मज्ञान जागृती हा लोक कल्याणाचा आधारस्तंभ असल्याने आत्मज्ञान होणं हेच जीवनातील गुह्य ज्ञान आहे.

मोह माया मुक्त होऊन आत्मस्वरूप होण्यासाठी महत्वाचं असणार आत्मज्ञान एकदा उमजल कि मग जीवन सफल झाल अस समजा या साठी कुठं जाण्याची आवश्यकता नाही. तर आपण जिथे आहोत तिथुनच स्वतःला अलिप्त करता आलं पाहिजे. ज्ञान अवगत होण्यासाठी अलिप्त होण गरजेच आहे. स्वतः जवळ धन द्रव्य संपत्ती सत्ता पद असं काहिच जवळ नसल्यावर विरक्ती घेणं मोह मुक्त होणं अथवा संसारातून मुक्ति घेणं हे फार कठीण नसत पण स्वतःकडे प्रचंड धन द्रव्य संपत्ती सत्ता पद असताना व राज पदावर विराजमान असताना भव्य दिव्य असं राज वैभवाचा क्षणात त्यागुन सर्व सामान्य व्यक्ती प्रमाणे जीवन व्यतित करत जीवनातील सगळ्यात मोठं सत्य शोधण्याचा प्रयत्न करण्यासाठी विरक्ती घेणं हे वाटत तितक सहज सोप नसत त्यासाठी गौतम बुद्धच व्हावं लागतं. शांतीचा महासागर, जगविख्यात तत्त्वज्ञानी युगप्रवर्तक बौद्ध धर्माचे संस्थापक जगाला मानवता शिकावणारे महान विद्वान पंडित भगवान महावीर गौतम बुद्ध हे हजारो वर्षे नंतर देखिल आजही संबंध जगासाठी एक आदर्श प्रेरणास्रोत उर्जा स्थान आहेत. आजही कित्येक वर्षे होऊन गेली तरी सुद्धा भगवान गौतम बुद्ध यांनी त्यांना झालेल्या बोधानंतर प्राप्त केलल गुह्य ज्ञान जगासाठी आदर्श तत्त्वज्ञान म्हणून लोककल्याण होण्यासाठी जगासमोर ठेवलं ते तत्त्वज्ञान आजही उपयोगी पडत . गौतम बुद्ध यांचे विचार लोक उपयोगी मानवतावादी असुन त्याच अनुकरण करण हे संबंध जगासाठी हितकारक ठरेल. म्हणून बुद्ध समजले पाहिजे उमजले पाहिजे. एकदा बुद्ध समजले तर जीवन सुखकर होण्यासाठी वेळ लागणार नाही. दया क्षमा शांती मानवता हि गौतम बुद्ध यांनी दिलेली शिकवण जगद कल्याणार्थ युगोयुगे उपयोगी पडणारी आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# हळदीच्या कार्यक्रमाला संविधान पुस्तिकेचे वाटप

## परिवर्तनाची नांदी : अंजली भोईर यांचे अनेकांकडून कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारतीय संविधान हे आपल्या देशाचे सर्वोच्च असे कायदेशीर दस्तऐवज आहे. अगदी ग्रामपंचायत पासून ते संसदेपर्यंत सर्वच शासकीय यंत्रणा या संविधानानुसारच चालतात. सर्व शासकीय व प्रशासकीय कर्मचाऱ्यांना पण संविधानानुसारच जबाबदाऱ्या पार पाडने बंधनकारक आहे. एवढेच नव्हे तर तालुका न्यायालयापासून ते सर्वोच्च न्यायालयापर्यंत सर्वच न्यायालयांचे निर्णय देखील याच संविधानाच्या चौकटीत असतात. एवढे महत्त्वाचे असलेले हे कायदेशीर दस्तऐवज प्रत्येक जबाबदार भारतीय नागरिकाने जाणून घेणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु वास्तव मात्र यापेक्षा वेगळे असून बहुसंख्य भारतीय संविधानाविषयी असलेल्या काही गैरसमजुतींमुळे संविधान जाणून घेण्याबाबत उदासीन आहेत. संविधान म्हटलं की, एका विशिष्ट समाजाशीच त्याचे नाते जोडले जाते. परंतु वास्तवात मात्र प्रत्येक भारतीय नागरिक हा 'भारतीय नागरिक' म्हणून मिळणारे सर्वच लाभ हे केवळ ह्या संविधानामुळेच उपभोगतो आहे. याच बाबींची जाणीव अनेक सामाजिक कार्यकर्ते समाजातील विविध घटकांना करून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत आणि त्याचा सकारात्मक परिणाम देखील दिसून येत आहे. याचाच प्रत्यय नुकताच कळंबोली, मुंबई येथे झालेल्या एका विवाह सोहळ्यादरम्यान आला. येथील इंटरनॅशनल ह्यूमन राइट्स कमिशनच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव अंजली हरिश्चंद्र भोईर या ओबीसी समाजातील भगिनीने आपल्या मुलाच्या लग्न सोहळात हळदीदरम्यान आलेल्या पाहुण्यांना मानपान म्हणून साडी-चोळी सारख्या पारंपारिक बाबी देण्याऐवजी भारतीय संविधानाचे साध्या सोप्या भाषेत विश्लेषण करणारे संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण लिखित 'आपले संविधान.. राज्यपद्धती नव्हे, तर जीवनपद्धती' हे प्रसिद्ध पुस्तक देऊन आपल्या समाजास संविधानिक आदर्श मूल्यांची ओळख करून देण्यासाठी एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे.

एक महिला आणि ती पण ओबीसी समाजाची! असे असूनही अशी क्रांतिकारी सुरुवात केल्याबद्दल संपूर्ण परिसरातून अंजली भोईर यांचे विशेष कौतुक होत आहे. यासाठी सामाजिक कार्यकर्ते गोरख राजगुरू, ठाणे यांनी पुढाकार घेऊन सदर उपक्रम यशस्वी



करण्यात मोलाची साथ अंजली भोईर यांना दिली. त्यांच्या संपर्कातील विविध समाजातील बंधू-भगिनींना अशा वेगवेगळ्या मंगलप्रसंगी संविधानाशी संबंधित पुस्तके देण्यासाठी प्रवृत्त करणार असल्याबाबत अंजली भोईर व गोरख राजगुरू यांनी याप्रसंगी संकल्प जाहीर केला. संविधान जनजागृतीसाठी उचललेले हे पाऊल नक्कीच समाजात संविधानिक आदर्श मूल्ये रुजवण्यासाठी मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास अंजली भोईर यांनी याप्रसंगी व्यक्त केला. यावेळी 'आपले संविधान... राज्यपद्धती नव्हे, तर जीवनपद्धती' या पुस्तकाचे प्रकाशक विलास पवार, गोरख राजगुरू, सुमेध रोकडे, रमेश राऊत, निलेश शेलार, वंदना आर्कडे तसेच अनिता राजगुरू आदी सर्व संविधानाचा प्रसार प्रचार करणारी इंटरनॅशनल ह्यूमन राईट कमिशनची टीम उपस्थित होती.

# ज्ञानकुंज कनिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** सोमवार रोजी कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल स्कूल बाजार सावंगी येथे महाराष्ट्रदिन व जागतिक कामगार दिन साजरा करण्यात आला या प्रसंगी सोपान दादा नलावडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तसेच प्रमुख पाहुणे म्हणुन सकाळ पेपरचे वार्ताहार पाटील सरांची उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त मार्गदर्शन करण्यात आले याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झिंजुर्के प्रा. मनोज राणे, श्रीमती योगिता पारनेरे नितीन पवार, राम राठोड, श्रीमती वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण, अविनाश गाडेकर, योगेश सुरडकर, श्रीमती सुरेखा जाधव, दीपक पाटील, राहुल गायकवाड, श्री भूषण जाधव, अविनाश कोलते, अक्षय जाधव, श्रीमती नलावडे, पाचवने मॅडम, चोपडे मॅडम, धुमाल बाबा यांची उपस्थिती होती.



# लग्नास नकार देताच झाडल्या गोळ्या

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** विवाहित महिलेने लग्न करण्यास नकार दिल्याने तिच्या छातीत आणि डोक्यात बंदुकीची गोळी झाडून हत्या करण्यात आली आहे. भूम तालुक्यातील चिंचपूर ढगे शिवारातील एका शेतात बुधवारी सकाळी या महिलेचा मृतदेह आढळून आल्यावर हा धक्कादायक प्रकार समोर आला. दरम्यान या प्रकरणी पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. अमृता अमोल बावकर ( वय 26 वर्षे ) असे मयत महिलेचे नाव आहे. तर लक्ष्मण ऊर्फ लखन नवनाथ नागने असे हत्या करणाऱ्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, चिंचपूर ढगे येथील संभाजी सुरवसे यांच्या शेतातील ऊसामध्ये साडीत गुंडाळलेला एका विवाहित महिलेचा मृतदेह बुधवारी सकाळी आढळून आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. दरम्यान माहिती मिळताच भूम पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळचं पंचनामा केला असता, महिलेची गोळी मारुन हत्या करण्यात आल्याचं दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी महिलेची ओळख पटवत, तातडीने तपासाची चक्रे फिरवली. दरम्यान मयत अमृता बावकर यांनी आरोपी लक्ष्मणसोबत लग्न करण्यास नकार दिल्याने त्याने हत्या केल्याचं समोर आले. पुणे जिल्ह्यातील पुनावळे येथे वास्तव्यास असलेल्या लक्ष्मण ऊर्फ लखन नवनाथ नागने याने 18 ते 26 एप्रिल या कालावधीत अमृता हीस गावातीलच संभाजी सुरवसे यांच्या शेतातील ऊसामध्ये बोलावून घेतले. दरम्यान अमृता या तिथे गेल्यावर लक्ष्मणने त्यांना लग्न करण्यास गळ घातली. मात्र आपण विवाहित असल्याने अमृता यांनी त्याला लग्नास नकार दिला. लक्ष्मण नागने याने अमृता यांच्या छातीत आणि डोक्यामध्ये थेट बंदुकीने गोळी झाडली. ज्यात अमृता यांचा जागीच मृत्यू झाला. अमृता यांची हत्या केल्यावर लक्ष्मणने मृतदेह साडीमध्ये गुंडाळून ऊसाच्या शेतात टाकून दिला. मात्र पोलिसांनी तांत्रिकदृष्ट्या तपास करत या सर्व प्रकरणाचं उलगडा केला आहे. तर या प्रकरणात मयत अमृताचे पती अमोल अनिल बावकर यांनी भूम पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भंडारा जिल्ह्यात अवकाळी पावसाची जोरदार हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**भंडारा :** जिल्ह्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावलेली आहे. यामुळे धान उत्पादक शेतकरी असो किंवा पालेभाजी वा बागायती शेती करणारे शेतकरी, निसर्गाच्या दुष्टचक्रात सर्वच सापडले आहेत. भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यातील कांदा उत्पादक शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले असून बांधातचे कांदा सडायला लागला आहे. तरीदेखील, प्रशासनाचे कोणताही अधिकारी पंचनामा करण्यासाठी शेत बांधावर फिरकले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये रोष व्यक्त होत आहे.

भंडारा जिल्ह्यातील बहुतांशः भागात भात पिकाची शेती केल्या जाते. मात्र, पवनी तालुक्यातील चौरास भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिचाळ परिसरात पारंपरिक भात पिकाऐवजी कांद्याचं मोठ्या प्रमाणात उत्पादन घेणारे शेतकरी आहेत. कांदा काढण्याचा हंगाम सुरू असताना सतत कोसळणाऱ्या अवकाळी आणि गारपिटीसह पावसानं उसंत घेतली नाही. पावसाच्या तडाख्यात विक्रीयोग्य कांदा शेत बांधावर पावसात सापडला आणि आता अक्षरशः तो सडू लागला आहे.

विक्रीयोग्य कांदा शेतातच पाण्यात सडायला लागल्यानं शेतकरी चिंताग्रस्त झाला असून शेतकऱ्यांचे डोळे पाणावल्याचे चित्र बघायला मिळते आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी कृषी विभाग आणि महसूल विभागाच्या तलाठी आणि मंडळ अधिकारी यांच्याशी वारंवार संपर्क साधून नुकसानीचा पंचनामा करण्याची विनवणी केली असता त्यांच्याकडून कुठलाही प्रतिसाद मिळत नसल्याचा शेतकऱ्यांनी रोष व्यक्त केला आहे.

हिंगोली तालुक्यासह औंढा नागनाथ तालुक्यांमध्ये आज साडेचार च्या दरम्यान अवकाळी पावसाने हजेरी लावली. वादळी सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस हा मुसळधार एक तास होता. औंढा नागनाथ येथील आज गुरुवारी बाजारचा दिवस असल्यामुळे अवकाळी पावसामुळे व्यापाऱ्यांची व भाजीपाला खरेदी करणाऱ्या ग्राहकांची चांगलीच धांदल उडाली. पाऊस जोराचा असल्यामुळे व्यापाऱ्यांचा भाजीपाला ही पावसाच्या पाण्यामध्ये वाहून गेला त्यामुळे व्यापाऱ्यांचेही या अवकाळी पावसामुळे नुकसान झाले.

महाराष्ट्र Business Katta












# भ्रष्टाचार व कामचुकारपणा कुठे नाही ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**सध्या भ्रष्टाचार हाच शिष्टाचार होऊन बसला आहे. भ्रष्टाचाराची जाळे-मुळे समाजामध्ये खोलवर रुजली आहेत. भ्रष्टाचाराला शिष्टाचाराचे स्वरूप येऊन जनतेची प्रचंड लूट होत आहे. जनतेला प्रत्येक कामासाठी आर्थिक व मानसिक त्रास सहन करून अतिरिक्त वेळ खर्च करावा लागत आहे. सध्या खाते/विभाग कोणताही असो, त्यामध्ये भ्रष्टाचार व कामचुकारपणा दिसून येतो. यामध्ये एखादे खाते किंवा विभाग कामचुकारपणा किंवा भ्रष्टाचार करत नसेल असे म्हणणे म्हणजेच भ्रष्टाचाराला शिष्टाचार समजणे होय.**

ज्या ज्या ठिकाणी लोकांचे कामे होत असतात, मग ते ग्रामपंचायत, तलाठी ग्रामसेवकांपासून तर संसदेपर्यंत प्रत्येक ठिकाणी प्रत्येक विभागांमध्ये भ्रष्टाचार व कामसुकारपणाचे स्त्रोत माजले आहे. काही अपवादात्मक अधिकारी व कर्मचारी वगळता त्या विभागात मात्र भ्रष्टाचार होतो किंवा कामचुकारपणा होतोच. कामचुकारपणा म्हणजे वेळेवर न येणे, वेळ अगोदर घरी जाणे, सर्वसामान्य लोकांची कामे वेळेवर न करता विनाकारण त्यांना मानसिक व आर्थिक त्रास देऊन एकाच कामासाठी वारंवार बोलावणे, यालाही काम चुकारपणा असे म्हणतात. भ्रष्टाचाराचा जर विचार केला तर भ्रष्टाचार म्हणजे केवळ पैशाची देवाण-घेवाण नव्हे, तर आपले आचरण भ्रष्ट करून, करून दिलेले काम म्हणजे भ्रष्टाचार. बरेच ठिकाणी बरीचशी कामे पैसा दिल्याशिवाय होत नाहीत. अनेक सरकारी कार्यालयामध्ये शासकीय फि वगळता काम करण्याच्या, त्यालाच आपण लाचेच्या रकमा म्हणू शकतो, त्याही फिक्स करून दिलेले असतात. वेगवेगळे दाखले, प्रमाणपत्र मिळवण्यासाठी लोकांना पैसे मोजावे लागतात. एवढेच काय तर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी केल्या जाणाऱ्या पंचनाम्या साठी सुद्धा अनेक ठिकाणी पैसे घेतले जातात. वेगवेगळ्या नोंदी, फेरफार किंवा काही गोष्टी एका नावावरून दुसऱ्या नावावर उतरवण्यासाठी, सर्व काही कायदेशीर असतानाही त्यांच्याकडून पैसा वसूल केला जातो. थोडक्यात काय तर भ्रष्टाचार हा एवढा फोफावलेला आहे की त्याला शिष्टाचार समजून लोक जगत आहेत. एखादे काम करायचे असेल तर पाच पन्नास रुपये द्यावेच लागतात, असे सहज बोलणारे लोक आणि लोकांची मानसिकता आज आपल्याला दिसून येते. एखाद्या जागृत व सुशिक्षित व्यक्तीने विना लाचेचे काम करून घ्यायचे झाल्यास त्या व्यक्तीला आर्थिक, मानसिक त्रास देऊन, वेळ खर्च करून घेतला जातो. एखाद्या व्यक्तीचे नाव राशन कार्ड मध्ये समाविष्ट जरी करायचे तरीही संबंधित व्यक्तीला पैसे दिल्याशिवाय ते नाव राशन कार्ड वरती येत नाही. याचा जर विचार केला तर देशामध्ये केवढ्या मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार असेल हे दिसून येते. भ्रष्टाचाराला किंवा लाचलुचपतला लोकांकडून पाहिजे तसा विरोध होत नाही, याचाच अर्थ या गोष्टी लोकांच्या वळणी पडून लोक त्याला शिष्टाचार समजायला लागलीत, हेच सिद्ध होते. आपण वेगवेगळ्या विभागातील कामकाज बघितले तर अनेक विभागांमध्ये कर्मचारी अधिकारी वेळेवर येत नाहीत. वेळे अगोदर घरी जातात. अनेक विभागांमध्ये ओळखी बघून लवकर कामे केली जातात. काही विभागांमध्ये काम करण्यासाठी हेतू पुरस्कार दिरंगाई केली जाते. काही कामांमध्ये हेतू पुरस्कार सर्वसामान्य लोकांना वारंवार बोलावले जाते. हे सर्व प्रकार भ्रष्टाचार व कामचुकारपणात मोडतात. कामाचा मोबदला म्हणून पगार मिळतो, सर्वसामान्य लोकांची कामे वेळेवर व कोणत्याही प्रकारचा त्रास न होता व्हायला पाहिजेत. कारण कोणतीही यंत्रणा, कितीही मोठी असली तरीही ती यंत्रणा लोकांपेक्षा मोठी नाही, ती यंत्रणा केवळ लोकांची सेवा करण्यासाठीच आहे हीच बाब सर्वसामान्य लोक विसरून गेले. व जे सेवेकरी आहेत ते सेवा न करता सेवेच्या नावाखाली मेवा खान्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य लोकांचे ज्याने जीवन विस्कळीत तर झालेच, परंतु कोणत्याही शासकीय कामकाजावर लोकांचा विश्वास राहिला नाही. कोणतेही काम करताना पैसा ओळख या गोष्टी असतील तरच सरकारी काम होते अशी धारणा लोकांच्या मनामध्ये आजही आहे. भारत हा धार्मिक व संस्कारी देश आहे. धर्माला येथे अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते. आपन ढोबळ मानाने जर विचार केला तर, कोणताही धर्म भ्रष्टाचार, चुकारपणा व सर्व सामान्य व्यक्तीला विनाकारण त्रास देण्याची शिकवण देत नाही. उलट असे करणे धर्माच्या दृष्टीने वाईट मानले जाते. वेगवेगळ्या पूजाअर्चा वेगवेगळे विधी केले जातात. वेगवेगळे उपास- तापास वेगळे क्रिया कर्म करून आम्ही धर्माचे आहोत हे दाखवून दिले जाते. मग भ्रष्टाचार कामचुकारपणा या गोष्टी करताना मात्र माणूस नितीमत्तेचाही विचार करत नाही, आणि धर्माचा ही विचार करत नाही. धर्माला बेईमान होऊन धर्माच्या शिकवणुकीच्या विरुद्ध वागून, भ्रष्टाचार आणि कामचुकारपणा करण्यात येतो. याचाच अर्थ लोकांना धर्माचे ही काही घेणेदेणे नाही. धर्माच्या नावाचा वापर केवळ सोयीनुसार करून स्वतःचे संरक्षण केले जाते. यापेक्षा धर्माचा कोणताही आधार लोक घेत नाहीत हेच दिसून येते. जर शासकीय कर्मचाऱ्यांनी आपले कर्तव्य योग्य पद्धतीने पार पाडले तर तो व्यक्ती कोणत्याही धर्माचा असो त्या धर्माचा सन्मान झाल्याशिवाय राहत नाही. हीच ताकद, हीच शिकवण भारतीय संविधानाने दिलेली आहे. देशातील कोणत्याही नागरिकांनी कर्मचाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी, राजकीय नेत्यांनी जो कोणी जबाबदार व्यक्ती आहे त्यांनी जर आपली कर्तव्य प्रामाणिकपणे पार पडली तर धर्माचा तर सन्मान होईलच, परंतु सर्वसामान्य लोकांचा वेळ, पैसा व मानसिक त्रास या गोष्टी टाळून, लोकांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी मदत होईल. देशाला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षाचा काळ उलटून गेला. तरीही देशातील नागरिकांच्या समस्या थोड्याही कमी झाल्या नाही उलट वाढत गेल्या. परंतु जे लोक जनतेचे सेवक होते आणि आहेत त्यांच्याकडे बघितले तर त्यांच्याकडे बर भक्कम संपत्ती, व भौतिक वस्तू मुबलक प्रमाणात आहेत. एकीकडे लोकांना कसण्यासाठी, उपजीविकेसाठी जमिनी मिळत नाही. दुसरीकडे दहा -दहा एकर मध्ये लोकांचे फार्म हाऊस तयार झाले. थोडा जरी विचार केला तर जो व्यक्ती दहा एकर जमीन फक्त ऐश्वोरामासाठी वापरतो, त्या व्यक्तीची संपत्ती नेमकी असेल तरी किती ? आणि त्याचे उत्पन्नाचे साधन असतील तरी कोणते ? कारण मेहनत आणि पगार याचा विचार केला तर एवढी संपत्ती कमावणे शक्य नाही. तरीही त्यांच्याकडे वेगवेगळ्या मार्गातून भ्रष्टाचार करून ते संपत्ती त्या ठिकाणी येत असते. अनेक शासकीय कर्मचाऱ्यांचा पगार हा हजारात असतो, परंतु नोकरीवर लागल्यानंतर त्यांचे घर व गाडी एकत्रपणे रकमेचा विचार केला तर करोडो मध्ये जाते. मग साधा प्रश्न येतो नोकरीला लागण्याच्या अगोदर दुचाकी वर फिरणाऱ्या व्यक्ती नोकरीवर लागल्यावर महागडे घर व महागडी गाडी घेतो. खरचं पगाराच्या जोरावर होऊ शकते का ? वीस वीस एकर जमीनीवाल्या शेतकऱ्यांकडे जशी गाडी नसते, तशी गाडी चतुर्थश्रेणीत काम करणाऱ्या अनेक कर्मचाऱ्यांकडे आहेत. थोडक्यात काय तर कामचुकारपणा करून आणि भ्रष्टाचार करून एवढा पैसा कमावलेला असतो. म्हणून लोक त्याला शिष्टाचार समजून भ्रष्टाचाराचे समर्थन करत आहेत. परंतु याचाच परिणाम सरकारी कामकाजा वरील विश्वास कमी होत आहे. श्रीमंत व गरीब ही दरी वाढत आहे. राजकीय नेत्यांच्या भ्रष्टाचाराचा विचार केला तर तो भ्रष्टाचार कल्पनाशक्तीच्या पलीकडचा आहे. आणि म्हणून देशाला सर्व गुण संपन्न करताना, देशाच्या विकासातील सर्व मोठी अडचण जर कोणती असेल, तर ती आहे भ्रष्टाचार. आणि आपण डोळस वृत्तीने जर बघितले तर काही कर्मचारी काही अधिकारी आपल्याला प्रामाणिक व कर्तव्याची जाण असलेले दिसुन येतील, परंतु एकही विभाग किंवा खाते असे दिसणार नाही की ज्या ठिकाणी लाचलुचपत, भ्रष्टाचार व कामचुकारपणा न करता सर्वसामान्य लोकांचे काम सहज व वेळेवर होतील.



म्हणून भ्रष्टाचार कामचुकारपणा या गोष्टी सर्वसामान्य लोकांनी समजून घेऊन कोणत्याही कर्मचारी, अधिकाऱ्यांना, कोणताही अतिरिक्त पैसा न देता आपली कामे वेळेवर व योग्य पद्धतीने करून घेण्याचा आग्रह करावा. शासकीय कार्यालयांमध्ये जेवढी शासकीय फी आहे तेवढेच पैसे भरून त्याची योग्य ती पोचपावती घेऊन, आपले काम करण्याचा आग्रह करून समाजामध्ये सुद्धा जनजागृती करावी. जेणेकरून भ्रष्टाचार व कामसुकारपणाला आळा बसून लोकांची कामे सोयीस्कर होतील. आणि सरकारी कामावरील विश्वास हा मजबूत होईल. सरकारी कार्यालयाची अवस्था बघितली तर, स्वच्छता, पिण्याचे पाणी, स्वच्छता गृह घाण दिसून येतात. मग शासनाकडून आलेला पैसा हा नेमका खर्च तरी कुठे होतो हे सुद्धा बघणे गरजेचे आहे. भ्रष्टाचार हा खूप मोठा गहण विषय आहे. तरीही ज्या ज्या ठिकाणी आपल्याला असे वाटते की हे नियमबाह्य आहे त्या ठिकाणी आपण आवाज उठवून भ्रष्टाचाराला आळा घालण्याचा प्रयत्न करून, जनजागृती करू शकतो. भारतीय समाज हा मेंढरा सारखा आहे. जोपर्यंत कोणी हिम्मत करणार नाही तोपर्यंत बाकीचे लोक शांतच बसून भ्रष्टाचाराचे समर्थन करतील. म्हणून जागृत नागरिकांनी या विरोधात आवाज उठववा, लोकांची कामे भ्रष्टाचार करताना मुक्त व्हावी यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

# तथागत भगवान गौतम बुद्ध



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**जगातील दुःख नाहीसे करण्यासाठी भगवान गौतम बुध्दांनी स्वतःचे घरदार सोडून ध्यान मार्ग आणि तपश्चर्येचा मार्ग अनुभवला. वैशाख पौर्णिमेच्या दिवशी त्यांना ज्ञानप्राप्ती झाली, दुःखाचे मूळ व ते नाहीसे करण्याचा मार्ग त्यांना सापडला म्हणूनच हा दिवस आपण 'बुद्ध पौर्णिमा' म्हणून साजरा करतो. विश्वाला शांती, अहिंसा, सत्याचा संदेश देण्यासाठी तथागत भगवान गौतम बुद्ध जन्मले. त्यांनीच बौद्ध धर्माची स्थापना केली. शाक्य गणराज्याचे राजे शुद्धोधन व महाराणी महामाया (मायादेवी) ह्यांच्या पोटी गौतम बुद्ध ह्यांचा जन्म झाला. त्यांच्या मातापित्यांनी त्यांचे नाव 'सिद्धार्थ' असे ठेवले. परंतु त्यांच्या जन्मानंतर काहीच दिवसात त्यांच्या मातेचे निधन झाले.**

त्यांचा सांभाळ त्यांच्या मावशीने म्हणजेच महाप्रजापती गौतमी ह्यांनी केला.त्यांच्याच नावावरून गौतम बुद्ध ह्यांना 'गौतम' असे नाव मिळाले. गौतम बुद्धांचा सांभाळ करणारी त्यांची दुसरी आई म्हणजेच मावशी महाप्रजापती गौतमी ह्या अर्हत पद प्राप्त झालेल्या महान भिक्खुणी होत्या. त्यांना जगातील पहिल्या भिक्खुणी मानले जाते, पुढे गौतम बुद्ध ह्यांचा यशोधरा ह्या राजकन्येशी विवाह झाला आणि त्यांना राहुल हा पुत्र झाला. महाज्ञानी गौतम बुद्ध ह्यांना जगातील दुःख बघून संसारातून विरक्ती आली व त्यांनी सर्व ऐहिक सुखांचा त्याग करून बोधिवृक्षाखाली तपश्चर्या केली.

अविरत तपस्येनंतर त्यांना ज्ञानप्राप्ती झाली. आणि त्यांनी बौद्धधर्माची शिकवण देऊन जगाला जीवनाचा खरा मार्ग व उद्देश दाखवला. गौतम बुद्ध ह्यांचा जन्म इसवी सन पूर्ण ५६३ साली नेपाळ मधील 'लुंबिनी' येथे झाला असला तरीही त्यांनी ज्या ठिकाणी ध्यान व तप करून ज्ञान प्राप्त केले व ते 'राजपुत्र सिद्धार्थ गौतम'चे "महाज्ञानी गौतम बुद्ध" झाले ती जागा म्हणजे भारतातील बोधगया होय. बोधगया बिहार राज्यात आहे. वैशाख पौर्णिमेच्या दिवशी गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली. ज्ञानप्राप्तीनंतर महाज्ञानी बुद्धांनी पाच पंडितांना उपदेश केला. त्यांच्या पहिल्या उपदेशास 'धम्मचक्कपवत्तन' किंवा 'धम्मचक्रप्रवर्तन' असे म्हणतात. ह्या प्रवचनात गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माची मुलतत्वे सांगितली. त्यांनी ज्या ठिकाणी हे प्रवचन केले ती जागा म्हणजे सारनाथ होय. सारनाथ हे उत्तर प्रदेश येथे आहे. तसेच गौतम बुद्धांनी ज्या नालंदा विश्वविद्यालयात ज्ञानदान केले ते नालंदा विश्वविद्यालय सुद्धा बिहारमध्ये म्हणजेच भारतातच आहे.

धम्मपदाच्या पहिल्याच गाथेत तथागत बुद्ध म्हणतात..

**मनो पुब्बूंगभा धम्मा मनोसेट्टा मनोमया।**
**मनसाचे पट्टट्टेत भासति वा करोति वा।**
**ततो नं दुक्खम न्वेति चक्कं व वहतो पदं**
**मनासाचे पसभेन भासति वा करोति वा।**
**ततो नं सुखमन्येति छाया व अनपायनि।।**

म्हणजेच माणसाचे सर्व व्यवहार मनोमय आणि मनप्रणीत आहेत. जसे बैलगाडीचे चाक बैलाच्या पायाचा पाठलाग करते त्याचप्रमाणें मनुष्य जर दुष्ट मनाने बोलत असेल किंवा वर्तन करत असेल तर दुःख त्याचा तसाच पाठलाग करते आणि मनुष्य जर प्रसन्न शुद्ध मनाने बोलत असेल किंवा वर्तन करत असेल तर कधीही सोबत न सोडणाऱ्या सावलीप्रमाणे सुख त्याची सोबत करते. राग, लोभ, द्वेष आणि वैरभावना ह्या सतत माणसाच्या आयुष्यात विष कालवण्याचं काम करीत असतात, म्हणून स्वतः अरिहंत या सर्व विकारांचा विनाश करून अर्हत होऊन बुद्ध मानवाला अवैराचा उपदेश देतात.



सर्व प्रकारच्या पापकर्माचा त्याग करून चांगल्या शुभ कर्माचं आचरण करणं आणि आपल्या चित्ताला विकारमुक्त करणं, हेच बुद्धांचं धम्मशासन असल्याची ग्वाही देतात. वैराने वैर वाढते मैत्रीने-प्रेमाने मात्र वैर संपते हे बुध्द आपणास सांगतात.

अनेकांना बौद्ध धर्माची शिकवण दिल्यानंतर त्याचा आणखी प्रसार करण्यासाठी गौतम बुद्ध ह्यांनी मगध राज्य व महाजनपदांत प्रवास करून हजारो लोकांना बौद्ध धर्माची शिकवण दिली. हे सर्व कार्य त्यांनी भारतातच केले. इसवी सन पूर्व ४८३ मध्ये त्यांचे महापरिनिर्वाण कुशीनगर येथे झाले.

गौतम बुद्धांचा सिद्धार्थ ते तथागत प्रवास कवी पंकज पाटील यांनी सुखाचा प्रज्ञामार्ग या रचनेत खालीलप्रमाणे अचूकतेने रेखाटला आहे.

**जन्माला बाळ सिद्धार्थ, प्राचीन लुम्बिनी शहरी ।**
**पिताश्री राजा शुध्दोधन, माता मायादेवीच्या उदरी ।।**
**जन्मदात्रीच्या मृत्यूनंतर, राजपुत्राची होईल आबाळ ।**
**बघून द्रवले हृदय म्हणून, मावशी गौतमीने केला सांभाळ ।।**
**शिक्षण घेतले श्रेष्ठतम, कशाचीच नव्हती उणिव ।**
**राजवैभवात वाढला गौतम, दुःखाची नव्हती जाणीव ।।**
**जाणिता जरा,व्याधी आणि मृत्यू, सर्वानाच जगी असे अटळ ।**
**गौतम झाला अती व्यथित, मनात माजली खळबळ ।।**
**रात्रीत त्यागिले पत्नी यशोधरेला, निघाला दुःखाचे शोधण्या उपाय ।**
**राहुलही पितृसुखा पारखा झाला, शोधे आत्मसुखासाठी करावे काय ।।**
**पाहून जगातील दुःख अपार, गौतमाला संसार विरक्ती आली ।**
**ऐहिक सुखाचा त्याग करुनी, तपश्चर्या केली बोधीवृक्षाखाली ।।**
**अविरत, कठोर तपस्येनंतर , त्यांना ज्ञानप्राप्ती झाली ।**
**नंतर जगाला बोधीसत्वाने, जीवनाची खरी वाट दाविली ।।**
**अहिंसा, सत्याची शिकवण, समता बंधुतेची विचारधारा ।**
**अंगिकारून जगावे जीवन, हाच सुखाचा प्रज्ञामार्ग खरा ।।**

आज जरी यश, सुख, समृद्धी आपल्या पायाशी लोळण घेत असले, तरी उद्या अथवा केव्हाही हे सर्व नष्ट होऊ शकते याची सतत जाणीव ठेवून आपण अहंकाराला दूर ठेवले पाहिजे. तसेच

मला जे मिळू शकले नाही, त्याबाबत दुःख करत रहाण्याऐवजी, जे काही मिळाले आहे, त्या बाबत आपण आभारी असले पाहिजे. जग अधिक चांगले व सुंदर करण्यासाठी हातभार लावण्याची संधी आपल्याला जेव्हा जेव्हा मिळेल, तेव्हा ती संधी आपण गमावता कामा नये अशी शिकवण तथागत गौतम बुद्धांनी आपणास दिली आहे. भारतात बौद्धधर्माची अनेक पवित्र स्थाने आहेत. पटना, राजगिर, नालंदा, श्रावस्ती, वैशाली, सांची येथे दर वर्षी अनेक बौध्दधर्मीय जाऊन दर्शन घेतात, येथील विहारांमध्ये ध्यान करतात. बौद्ध धर्माचे मूळ भारतातच आहे. बौद्धधर्मातील महत्वाची स्थाने व विहारांवरूनच ह्या राज्याला "बिहार" हे नाव पडले असे म्हणतात.

हिंदुत्वाचा ध्वज जगभर घेऊन जाणारे सकामी विवेकानंद गौतम बुद्धांविषयी म्हणतात, "तथागत गौतम बुद्धांएवढा बुद्धिमान, प्रगल्भ, परिपूर्ण माणूस जगाने आजवर पाहिलेला नाही. बुद्धांच्या सामर्थ्याचा एक थेंब माझ्याकडे असता, तरी खूप झाले असते! एवढा थोर तत्त्वचिंतक, असा शिक्षक कोणीच आजवर बघितला नाही.

बुद्ध हे नाव नसून ज्ञानाची उपाधीच आहे विश्वाला शांततेचे संदेश देणारे विश्व वंदनीय, महाकरुनी, तथागत भगवान गौतम बुद्धांना कोटी कोटी प्रणाम. प्रज्ञा, शील आणि करुणा यांचा जीवनात अंगीकार करणाऱ्या सर्वांनाच बुद्धपौर्णिमेच्या मंगलमय शुभेच्छा.


# बुद्ध पौर्णिमा



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**५ मे, आज वैशाख पौर्णिमा आजच्याच दिवशी भगवान गौतम बुद्धांचा महामाया व राजा शुद्धोदन यांचा पुत्र म्हणून लुम्बिनी वनातील शाल वृक्षाखाली जन्म झाला होता म्हणून वैशाख पौर्णिमेला बुद्ध पौर्णिमा असेही म्हणतात. ही तिथी वर्षातील सर्वात पवित्र आणि महत्वाची तिथी मानली जाते. बुद्ध पौर्णिमा आणखी तीन कारणांसाठी पवित्र मानली जाते ती म्हणजे याच दिवशी तथागत भगवान गौतम बुद्धांचा जन्म झाला होता, याच दिवशी बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती आणि याच दिवशी बुद्धांचे महानिर्वाण झाले होते म्हणून या पौर्णिमेला त्रिगुणी पौर्णिमा असेही म्हणतात. बुद्ध पौर्णिमा केवळ भारतातच नाही तर जगातील १८० हुन अधिक देशात साजरी केली जाते.**



भारत, चीन, जपान, नेपाळ, भूतान, म्यानमार, थायलंड, श्रीलंका, मलेशिया, व्हिएतनाम, सिंगापूर, अमेरिका, कंबोडिया, इंडोनेशिया या देशात तर बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. जगातील सर्व बौद्ध धर्मीय बांधव बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करतात. बुद्ध पौर्णिमेला बोध गया येथे जगभरातून बौद्ध अनुयायी येतात आणि प्रार्थना करतात. बौद्ध धर्माच्या धर्मग्रंथाचे वाचन, पठण केले जाते. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे २ मे १९५० रोजी भारतात पहिली सार्वजनिक बुद्ध पौर्णिमा साजरी केली गेली. २७ मे१९५३ रोजी भारत सरकारने बुद्ध पौर्णिमेला सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. आज बुद्ध पौर्णिमेला सार्वजनिक स्वरूप आले आहे. भारतातील बौद्ध अनुयायी हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करतात. या दिवशी बुद्ध विहारे रंगीबेरंगी पताका, फुलांनी सजवली जातात. बौद्ध बांधव यादिवशी गोडधोडाचे जेवण करून आपले मित्र नातेवाईक यांना घरी आमंत्रण देतात. बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी सर्व बौद्ध भिक्षु व बौद्ध बांधव बुद्ध विहारात एकत्र येऊन प्रार्थना करतात. बुद्ध मूर्तीजवळ दीपप्रज्वलन करतात. बुद्धांची शिकवण अंगिकारण्याचा संकल्प करतात. बुद्धांनी सांगितलेल्या मार्गाने चालण्याचा निश्चय करतात. गौतम बुद्ध हे भारताचे सर्वोत्तम भूमिपुत्र आहेत. तथागत भगवान गौतम बुद्धांनी त्यांना मिळालेले ज्ञान समाजापर्यंत नेऊन एका वेगळ्या बदलाची पायाभरणी केली. त्याकाळात अंधश्रद्धा, कर्मकांड पाखंड यांनी उच्चांक गाठला होता. गौतम बुद्धांनी यावर प्रहार केला. नरबळी, पशुबळी, अंधश्रद्धा, कर्मकांड यांना त्यांनी कडाडून विरोध केला. गौतम बुद्धांनी मानव कल्याणाचा उपदेश केला. लोकांमध्ये असलेल्या स्वर्ग,नरक या भंपक गोष्टींबद्दल असलेली भीती दूर करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. गौतम बुद्धांनी आपल्या अनुयायांना चार आर्यसत्य सांगितली ती चार आर्यसत्य आचरणात आणल्यास मानवाचे जीवन आनंदमय होऊ शकते. ती चार आर्य सत्य म्हणजे

**१ ) मानवाला दुःख असते.**
**२ )दुःखाला कारण असते.**
**३ ) दुःखाचे निवारण करता येते.**
**४ ) दुःख कमी करण्याचे उपाय आहेत.**

मानवी जीवनातील दुःख निवारण्यासाठी बुद्धांनी आठ मार्ग सांगितले आहेत. यम, नियम, आसन, प्राणायम, प्रत्याहार, ध्यान, धारणा, समाधी. गौतम बुद्धांनी आयुष्यभर शील, समाधी आणि प्रज्ञेचा मार्ग शिकवला. त्यांनी करुणा विकसित करण्याचा आणि समता, स्वातंत्र्य व बंधुत्व यावर आधारित जीवन जगण्याचा धडा लोकांना दिला. आज बुद्ध पौर्णिमेपासून सर्वांनी शिलाचे काटेकोरपणे पालन करून आपली काया, वाचा व मनाची कृती निष्कलंक राहील असा संकल्प करावा. सर्व नागरिकांनी तथागत गौतम बुध्दांच्या मार्गाने चालावे. गौतम बुद्धांनी दाखवलेला मार्ग हाच मानव मुक्तीचा मार्ग आहे.

# तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धांना समजून घेताना



सौ. प्रतिमा अरुण काळे
संपर्क क्र. 9405042938

आधुनिक केसरी

**विश्वाला शांततेचा संदेश देणाऱ्या महाकारूणिक तथागत भगवान गौतम बुद्धांना समजून घेताना खरंच आज आम्ही कितपत त्यांनी दिलेल्या पाऊलवाटेने चालतांना बुद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचार करण्यासाठी प्रयत्न करण्यात कुठे कमी पडलो याचा एक छोटासा लेखाजोखा आपल्या समोर मांडण्याचा अन् बुरसटलेल्या विचारसरणीचा पायंडा अन् समाजात पसरलेले न्युनगंड आपल्या समोर शब्दातीत करण्याचा प्रयत्न करते.**

तथागत भगवान गौतम बुद्ध एक राजबिंडा देखणा राजकुमार अक्षरशः धनवैभव पायाशी लोटांगण घालत असतांना देखील त्या वैभवाचा कुठलाही गवगवा न करता त्या स्वर्गमहालात रमलाच नाही,का कुणास ठाऊक पण सिद्धार्थ हा एक राजकुमार, ज्याच्या मिठीत स्वर्ग विसावलेला असतांनाही ते राजवैभव सोडून निसर्गाच्या सान्निध्यात अधिकाधिक रमला गेला त्याचे उदाहरण म्हणजे सिद्धार्थ गौतम बुद्ध ज्यांचा जन्म निसर्गाच्या कुशीत वसलेल्या नेपाळमध्ये असलेल्या लुंबिनी या ठिकाणी झाला. लुंबिनी येथे माता महामाया महालाबाहेर भटकंती करत असताना भटकंतीने थकवा आल्यामुळे वनातील एका वटवृक्षाखाली विसाव्या करिता थांबलेल्या असतांनाच प्रसव वेदना जाणवून त्याच ठिकाणी सिद्धार्थाचा जन्म झाला,पण या बाळाच्या जन्मावेळी ऋषीमुनींनी भविष्यवाणी केली होती की जरीही या बाळाचा जन्म राजकुळात झालेला असला तरीही त्यांचे मन या राजवैभवात कधीही रमणार नाही तर हे बाळ या विश्वासाठी आपल्या कुळासाठी एक आदर्श असेल, इतकं उज्वल भविष्याची नांदी घेऊन जन्माला आलेल्या बाळाला मात्र आपल्या जन्माच्या अवघ्या सातव्या दिवशीच मायेच्या ममतेला मुकावे लागले, भलेही त्यानंतर त्यांचा सांभाळ त्यांची मावशी तसेच सावत्र आई महाप्रजापती गौतमी यांनी केला, त्यांच्या संगोपनात लहानाचा मोठा झालेल्या राजकुमार सिद्धार्थाला गौतम या टोपण नावाची ओळख मिळाली. पण विश्वशांतीचा निर्माता असलेल्या या बाळाच्या कर्तृत्वाचे धनवैभव पाहण्याचे भाग्य जन्मदात्या आईला मिळाले नाही,खरेतर शोकांतिकाच म्हणावी ना ही या जन्माची.

दिवसामागून दिवस गेले वर्षामागून वर्ष सरले तसा सिद्धार्थही लहानाचा मोठा होत गेला अन् त्यानुसार आवश्यक असलेल्या शिक्षणाची पुर्तता महालातच मिळत गेली परंतू त्या राजमहालात गौतमाचे मन कधी स्थिरस्थावर झालेच नाही त्यातच वाढलेल्या वयाची जाणीव म्हणून यशोधरा नावाच्या सुंदर सोज्वळ राजकन्येशी त्यांचा विवाह करण्यात आला,त्याचीच फलश्रृती म्हणजेच त्यांना झालेली राहूल नामक पुत्राची पुत्रप्राप्ती त्या बाळाला पाहूनही पित्याचे हृदय कळवळले नाही, किती खेदाची बाब सांगण्यास वाटत असली तरीही राजमहाली रममाण होणारे मनच सिद्धार्थ गौतमाचे नव्हते, निसर्गाच्या सान्निध्यात जन्मलेल्या या बाळाला सवंगड्यासह महालाबाहेर फिरत असतांना वेदनेने कळवळणारे राजहंस दिसले, ज्याला सिद्धार्थाचा चुलत भाऊ देवदत्त याने बाण मारला होता, पण त्या राजहंसाची वेदना जणू आपलीच वेदना आहे असे समजून त्या राजहंसाच्या वेदनेवर ममतेची फुंकर मारणारा करूणा सागर सिद्धार्थ गौतमाच्या ममतेने, मायेने, दयेने अन् स्पर्शाने नवीन भरारी घेण्यासाठी तयार होवून स्वैरपणे स्वच्छंदी आकाशी उडाले, या करूणाकाराच्या कृतीने जणू पक्षाला फक्त स्वच्छंद विहारण्याचे परमभाग्यच लाभले नाही तर एक राजवैभवाचा जन्मजात शिक्का घेऊन जन्माला आलेल्या या बाळाने करूणा स्वतःच्याच नव्हे तर प्रत्येक काळजात प्रतिमारूपी कोरताना आपल्या अस्तित्वाची नवी नांदी विश्वात निर्माण करून दिली होती. करूणेचा सागर होवून करूणेने तळमळणारा विश्वनिर्माता उदयास येण्यास हीच खरी सुरूवात झाली होती.

इथ पर्यंतचा हा प्रवास विश्वकल्याणाकरिता नव-नवीन पाऊलवाटा रोजच सुवर्णाक्षरांनी अध्याय लिहित असताना भारतातीलच नव्हे तर साऱ्या विश्वातील सिद्धार्थ हा एकमेव असा राजा जो दुसऱ्यांचे दुःख पाहून त्या दुःखावर मात करण्यासाठी आपल्या साऱ्या वैभवाला सोडून दुःखाचे मुळ शोधण्या निघून गेला,किती खेदजनक बाब असेल. आजवर त्याची जगाकडे पाहण्याची खिडकी त्याला जगाचा फक्त फुलपाखरी नजारा दाखवत होती.पण आज त्याने त्याच्या पित्याने मोठ्या कष्टाने त्याच्यापासून दूर ठेवलेले, भयाण वास्तव पाहिले, घर भरून उरणारे दारिद्र्य त्याने पाहिले, प्रथमच, जीर्ण शरीराचा रुग्ण पाहिला, जराजर्जर वृद्धत्व पाहिले, एक प्रेतयात्रा त्यास दिसली. त्याचा सारथी चन्नने त्यास सांगितले,की या साऱ्या जीवमात्राच्या अटळ अशा स्वाभाविक अवस्था आहेत. त्याच्या जगाच्या संदर्भात या जाणिवांना जागाच नव्हती. या गोष्टींचा त्याला अर्थ लागेना,तो सुन्न होऊन गेला,आपले सुख हा अपवाद आहे आणि जग दुःखात आकंठ बुडालेले आहे हा त्याला साक्षात्कार झाला.त्यानंतर त्याने एक संन्यासी त्याने पाहिला आणि त्याची झोपच उडाली, सुखात मन रमेनासे झाले. आपल्या वर्तमान सुखी आयुष्याची फलनिष्पत्ती जर शेवटी हीच अटळ असेल तर कठीण आहे असे त्याच्या मनाने घेतले.यांतून मुक्त होण्यासाठी संन्यास हाच अंतिम मार्ग उमजून त्याने संसाराचा त्याग करण्याचे ठरविले.ऐन तारुण्यात वयाच्या २९ व्या वर्षी एका पावसाळी रात्री,प्रिय पत्नी यशोधरेचे ओझरते अंतिम दर्शन घेऊन आणि बाळ राहुलचे मुख हळूच चुंबून सिद्धार्थ राजवाड्याबाहेर निघाला.त्याच्या सोबतीला सारथी चन्न 'कंठक' नामक घोड्यासह उभा होता. चन्नाने कंथकाच्या टापांचा आवाज होऊ नये म्हणून त्याचे खूरही कापडात बांधले होते,जेणेकरून कोणाला काही समजण्याच्या आत सुखाच्या सागरातून बाहेर पडून तृष्णेमागचे खरे कारण शोधायचे होते. मोठ्या धिटाईने, संयम ठेवून,आशेने आपली पत्नी,आपले लेकरू, राजवैभव, माय-बाप आणि मनात असलेल्या असंख्य स्वप्नांचा त्याग करणारा साऱ्या विश्वाचा बाप बनताना एक आदर्श निर्माण करून गेला, सारे विश्व मोहमायेच्या गर्तेत अडकलेले असताना मनातील तृष्णा हेच या दुःखाचे मुळ अन् त्याच तृष्णेचे मूळ कारण शोधण्या सारा देह अस्थिपंजर झाला तरीही आपला भला जन्म उभ्या मानवजातीच्या भल्यासाठी वाहणारा विश्वगुरू सिद्धार्थ गौतमानंतर आजतागायत जन्माला आलेला नाही, नाही तर आम्ही तथागताचा खोटा-खोटा का होईना उदो-उदो करताना आपल्याकडे असलेल्या संपत्तीच्या लालसेचा बळी होतांना कितीही संपत्ती असली तरी आत्मसंतुष्टी आजही कोणाच्या मनात आजतागायत दिसत नाही,खरंच सांगा आम्ही तथागताचे पाईक होण्या लायक आहोत का??? की नुसते महापुरुष फक्त घरामध्ये फोटोत, मूर्तीत, पुतळ्यात बंदिस्त करून त्यांच्या विचारांचे पाईक होण्याऐवजी बुरसटलेल्या विचारसरणीचे प्रचारक होतांना खरंच कुठे गहाळ होते आपली बुद्धी,खरी शोकांतिका या मानव जातीची यापेक्षा जास्त कुठे असेल असे वाटत नाही,आपल्या साऱ्या वैभवाचा एका धर्मपत्नीचा,लेकराचा त्याग करणाऱ्या बुद्धाचा कुठला विचार आम्ही खऱ्याअर्थी डोक्यात घेतला??? उभ्या मानव जातीच्या कल्याणासाठी झटणाऱ्या तथागताला काय दिले आम्ही तर फक्त हेळसांड खोट्या -खोट्या मनात रूजवलेल्या बुद्धत्वाची, हापापलेल्या विचारसरणीची पाऊलवाट कधीकधी असाही विचार मनात डोकावला जातो उगाचच उभा देह त्यांनी मानव जातीच्या कल्याणासाठी घालवला पण आम्ही मात्र अक्कलशुन्य होवून आत्मसात केले नाही, म्हणजे आम्ही फक्त दगडच राहीलो. आजकाल आम्ही जेथे जातो तेथे फक्त 'हम बुद्ध की धर्तीसे आए है'! चा नारा जिथे -तिथे देतो पण त्याच धर्तीची ओळख वृत्तपत्रात फक्त काय देतो तर.. वैशाली नगरीची रुपाची खाण,'सौंदर्यवती आम्रपाली' हिने आपल्या मोहक अदांनी तथागताच्या शिलाचा भंग करण्याचा अतोनात प्रयत्न केला पण अतोनात प्रयत्न करूनही ती त्यांचे शील भंग करू शकली नाही, हीच तथागताच्या धम्माची खरी ताकद होती, नाही तर "आम्ही ओठात एक अन् पोटात एक" या उक्तीप्रमाणे फक्त अन्याय,अत्याचारांनी फक्त आया बहिणींची अब्रू लुटण्याचा अन् त्यांना कमी लेखण्याचा प्रयत्न करत असतो, अन् यातून काय सिद्ध करतो हेच कळत नाही. जर खरंच आम्ही बुद्धाच्या नावाने तिथे आमची ओळख देत असतो तर पर स्त्री बहिणी समान न मानता जिथे तिथे तिच्या अब्रूची लक्तरं का मांडत असतो? काय म्हणावं या मानसिकतेला, कधी समजणार आम्ही बुद्धाच्या त्यागाला? शिकवणुकीला?? की फक्त बुरसटलेल्या विचारसरणीने कमीपणाचं जिथे तिथे देत राहणार

असो खूप स्तोम माजलंय प्रत्येक ठिकाणी आतातरी अनुसरा बुद्धाच्या शिकवणीला,विपश्यनेला जेणेकरुन आपल्या मुक्तीचा मार्ग तिथेच सापडेल, तिथंच कळणार जीवनाचा मोक्ष पण ती समज कधी येणार आम्हाला कारण बुद्ध धम्माला स्मरतांना आम्ही याच गोष्टींमध्ये मागासलो आहे. यात हा फक्त आमचाच मागासलेपणा नसून एक



प्रकारचा आमचा आडमुठेपणा आहे हा आम्ही ना धम्म समजून घेणार ?ना त्याची शिकवण? याचाच आपण सर्व भोगत असलेला तोटा म्हणजे बुद्धाच्या आधी तेवीस बुद्ध होवून गेले,पण सिद्धार्थानंतर एकही बुद्ध आजतागायत जन्माला आला नाही. काय कारण असेल याचे,याचा जराही विचार केला का??? कोठे कमी पडतो आपण??? काय बदलले? ? कशामुळे बदलले?? शिक्षण भरपूर घेतो.. पण त्या शिक्षणाचा उपयोग कशासाठी करतो? विचार कधी करतो का? पूर्वीच्या महिलाही प्रत्येक गोष्टीत तरबेज होत्या? समान वागणूक होती? आता असे चित्र का बदलले? शिक्षण झाले की,नोकरी? नोकरी झाले की छोकरी अन् ते झाले की मुल बाळ ..आपला स्वतः चा संसार...याच्यापलिकडे एक जग असते याचा कधी विचार केला का? आपण समाजाचे काही देणे लागतो हे नित्य ध्यानी का घेत नाही? माणुसकी धर्मच आपण विसरत चाललो अन् वेगवेगळ्या झेंड्यांचे.. वेगवेगळे धर्म आपण विस्तारत चाललो.. भांडणे,तंटे वाढले ?रक्त सांडले जाते, शिव्याशाप देणे,मनस्ताप देणे,एखाद्याला नावे ठेवणे, पुतळ्यांवर आपण चिखलफेक करायला, शाई फेकायला, चपलाहार घालायला कमी करत नाही,ही झाली आपली क्रूर मानसिकता. हिंसक प्रवृत्ती प्रबळ होत चालली,शांतीचा मार्ग विसरून चाललो...असे का घडते??

फोटो पुजन, मोठ- मोठे हारतुरे घालणे,भाषण ठोकणे, जयंती-पुण्यतिथी साजरे करणे, याने आपण त्यांच्या मार्गावर चालतो का? आपल्या आतील मनात जरा तरी डोकावून पाहिले का? मुक्या प्राण्यांना ही भावना, मन असते या गोष्टीचा विसर पडता कामा नये. त्यांची हत्या करून त्यांचे मांस भक्षण करणे कितपत योग्य? इतरांना जेव्हा आपण शब्दाने दुःखावतो,तेव्हा त्याच्या काळजावर किती जखमा होत असतील,त्याचे वण जसेच्या तसे कायम स्वरुपी राहतात. प्रेमाचे दोन गोड शब्द बोलणे, छान हास्य देणे, समोरच्याचे कौतुक करणे ही माणुसकीची लक्षणे कधी प्रत्येकामध्ये दिसतील. नावे ठेवण्यात, पाय ओढण्यातच आपले जीवन घालवायचे की, मिळालेल्या जीवनाचे सोने करायचे..माणुसकी पेरायची. दिलेल्या वाढत जाते,ते प्रेम असो वा द्वेष असो...मग ते आपणच ठरवायचे आपल्याला काय हवे..तेच आपण इतरांना द्यावे.दिले ते मिळते..हे नेहमी ध्यानी ठेवावे.

समोरच्याला अपशब्द बोलणे, त्याचे मन दुःखावणे यातून काय मिळते. कोणते सुख, कोणता परमानंद होतो..ते तरी सांगा. बोले तैसे चाले ,त्याची वंदावी पाऊले. आपली वाचा नेहमी गोड, मधाळ, नाजूक, कोमल असावी. फुलपाखराचे आयुष्य पहा किती दिवसाचे पण, सगळ्यांच्या चेहऱ्यावर हास्याची लकेर देवून जाते. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन आपला बदलला पाहिजे. मनुष्य जन्म मिळणे किती महान,या जन्माचे आपण सार्थक केले पाहिजे. देण्यासारखे आपल्याकडे प्रेमाचे दोन शब्द असतात ते आपण दिल खुलासपणे द्यावेत.आपण जातांना काहीच घेवून जात नाही,आपले उत्तम कार्य फक्त देवून जातो.आलो मोकळ्या हाती,जातोही मोकळ्याच हाती. मग इतकी हाव कशाला?? स्वतःचा वर्तमान जगा ना,भविष्याची चिंता करून आजचे जीवन का हरवून बसतात? कोणाला किती आयुष्य हे कोणाला तरी सांगता आले का? म्हणून आलेला दिवस सत्कर्मी लावण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करावा. जन्म घेताना आपण रडतो पण सारे जग हसते, अन् जाताना सारे रडते अन् आपण शांत झोपलेले असतो चिरनिद्रेत.आपली प्रतिमा ही उज्ज्वल, निर्मळ, प्रेमळ ठेवावी. नेहमी सढळ हाताने मदत करावी.जे- जे चांगले गुण आहे ते -ते सढळ हाताने देत जावे.


असो, यानंतर उचलला गेलेला मुख्य मुद्दा रसाळ वाणीचा, खरंच आम्ही बुद्धाच्या धम्माचे पाईक म्हणून शोभतोय का? ज्या सिद्धार्थाने या रसाळ,मधाळ वाणीने एक जंगली मदमस्त हत्ती देखील तथागतापुढे नतमस्तक होऊन त्यांच्या विचारांचा पाईक झाला होता, त्यानंतर येतो तो अंगुलीमाल, ज्याच्या नावानेही लोकांमध्ये धडकी भरायची त्या अंगुलीमालाला फक्त आपल्या रसाळ वाणीतून बोध देवून नामोहरम करणारा जगातील एकमेव निशस्त्र लढा यशस्वी करणारा आणि अहिंसक मार्गाने लढाई जिंकणारा राजा म्हणून तथागथातील शांती सम्राट उदयास येवून प्रेमाने जग जिंकता येते याची शिकवण मानवास दिली,इथेही आम्ही ही शिकवण प्रत्येक काळजात कोरण्यात कमी पडलो,आणि मी पणा नावाची कीड मानवी हृदयात अधिराज्य गाजवून "तोडो नहीं जोडो" ऐवजी ,"जोडो नहीं तोडो" या उलट विचाराने आपुलकीचे ऋणानुबंध,भावबंध आणि आपुलकी,जिव्हाळ्याचे सर्वच नाते तोडून एकलकोंडा बनून आयुष्य व्यतीत करू लागला,धनाची लालसा बाळगू लागला,व्याभिचार करु लागला, वाममार्गाला जावून प्रगती करु लागला,हे कितपत योग्य,तरीही कळतंय पण वळत नाही असेच काहीसे वर्तन मानव करू लागला???असे का?अन् कशासाठी?

देहाचे वारूळ होणारा बुद्ध जर आज अस्तित्वात असता तर आपण का आणि कोणासाठी हा त्याग केलाय तर फक्त मीच श्रेष्ठ या मिजाशीमध्ये वावरणाऱ्या मानवजातीसाठी,ही चिंता त्यांनाही आयुष्याच्या प्रत्येक वळणावर छळत राहीली असती.

"अंतकरण करून शुद्ध मनी विसावला बुद्ध".माझ्याही आयुष्यात जे उत्तम बदल झाले ते तथागत गौतम बौद्ध यांच्याच विचारांमुळे. तथागत गौतम समजून घेताना सर्व धर्म, पंथ,जात, द्वेष विसरून जात आयुष्यात खूप बदल होत जातात, ते मी अनुभवले. चांगली वाणी बोलावीशी वाटते, इतरांविषयी हृदयात आपोआप प्रेमभावना जागृत होते, कुणाचाही द्वेष करु वाटत नाही, आनंदी आयुष्य जगावं वाटतं, संयम येतो, शांतता मिळते, विचारी, आचारी बनतो, कशाचीही चिंता लागत नाही, आहे ते जीवन

**क्रमशः**

# संयुक्त महाराष्ट्र... लढले कोण ? मेले कोण ? गब्बर झाले कोण ?



मधुकर भावे
ज्येष्ठ पत्रकार

आधुनिक केसरी

**मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा ६३ वा वाढदिवस आहे. बघता-बघता महाराष्ट्र राज्य ६३ वर्षांचे झाले. साठीनंतर व्यक्तीला अधिक समंजस्यपणा यावा, असे मानले जाते. साठीनंतरचा काळ 'काटे नसलेल्या गुलाबा'सारखा असतो, असे मानले जाते. आजची राज्याची परिस्थिती समंजसही नाही. आणि काटे नसलेल्या गुलाबाची तर अजिबातच नाही. या ६० वर्षांच्या आगोदरचा म्हणजे १९५५ ते १९६० हा पाच वर्षांचा महाराष्ट्राचा काळ. देशाच्या कुठल्याही राज्यात लोकशाहीचा इतका प्रचंड शांततापूर्ण मार्गाचा लढा झालेला नाही. ब्रिटीशांच्या काळातील 'जालियनवाला बाग हत्याकांड' सोडले तर या संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शांततामय मार्गाने आंदोलन करणाऱ्या सत्याग्रहींवर गोळ्या चालवून १०५ माणसांचे बळी घेतले गेले.**

शेकडो माणसे अपंग झाली. अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. पण या लढ्याने महाराष्ट्राची एकजूट साऱ्या देशाने पाहिली. असा हा संयुक्त महाराष्ट्राचा लढा आणि चळवळ घराघरात पोहोचवली ती शाहीरांनी. दोनच दिवसांपूर्वी म्हणजे २५ एप्रिलला शरद पवार साहेबांच्या हस्ते 'गर्जा महाराष्ट्र माझा' या राजा बढे यांच्या अमर गिताचे अनावरण यशवंतराव





चव्हाण प्रतिष्ठानमध्ये झाले. त्यावेळच्या भाषणात शरद पवारसाहेबांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळ शाहीरांनी घराघरात पोहोचवल्याची माहिती दिली. त्यात शाहीर साबळे यांचाही उल्लेख केला. 'महाराष्ट्र गीत' शाहीर साबळे यांच्यामुळेच घराघरात पोहोचले, अमर झाले... तोंडपाठ झाले. शाहीर साबळे यांच्यावर आता चित्रपट येत आहे... त्याचेही स्वागत. आता तर राज्य सरकारने ते 'जय जय महाराष्ट्र माझा' सन्माननीय राज्यगीतही केले. त्यातील दोनच कडवी उचलली... आणि त्यातील एकच ओळ शरद पवार साहेबांच्या मनात घर करून बसली....

'भीमथडीच्या तट्टांना या यमूनेचे पाणी पाजा....' यातील भीमथडी म्हणजे भीमा नदीच्या काठावरचे बारामती गाव. अनेकांना हा तपशील माहिती नव्हता. याच कार्यक्रमात पवारसाहेबांनी शाहीरांचे कौतुक केले. पण, पवारसाहेबांना हे सांगणे आहे.. ज्या शाहिरांनी सगळी ताकद पणाला लावून पाच वर्षे महाराष्ट्रात हा जागर केला... त्यांचे महाराष्ट्राने काय कौतुक केले.... ? आणखी एक गोष्ट स्पष्टपणे सांगितली पाहिजे.... शाहीर साबळे हे मोठेच शाहीर होते... संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर त्यांचे अनेक कार्यक्रम महाराष्ट्राने डोक्यावर घेतले. पण, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सारा महाराष्ट्र घुसळून काढण्याचे काम ज्या शाहीरांनी केले... त्यात शाहीर साबळे नव्हते. प्रामुख्याने अमर शेख यांचेच कलापथक आणि अण्णाभाऊ साठे हेच प्रमुख होते. त्याचे एक राजकीय कारण होते... कारण मुंबईची चळवळ कम्युनिष्ठांच्या हातात होती. तरीही ही सगळी चळवळ ज्या शाहीरांनी आपल्या खांद्यावर घेतली त्याचे महामेरू लोकशाहीर अमर शेख, महान कवी आणि लेखक अण्णाभाऊ साठे. आत्माराम पाटील... शाहीर गव्हाणकर... शाहीर जंगम... शाहीर गजाभाऊ बेणी... शाहीर जैनु शेख... आणि त्यांना साथ देणाऱ्या आमच्या केशरताई जगताप... ( नुकतेच केशरताईंचे निधन झाले. ) या कलापथकाने कसलीही अपेक्षा न करता... अख्खा महाराष्ट्र घुसळून काढला आहे. महाराष्ट्राचा इतिहास समजून घ्यायचा असेल तर संयुक्त महाराष्ट्र होण्यासाठी जो वणवा पेटला होता त्याची सगळी मानसिक तयारी शाहीर मंडळींच्या आग ओकणाऱ्या पोवाड्यांनी केली होती. आज ते दिवस समोर येतात.. त्या सभा... ते मोर्चे... त्या लढाया... त्या घोषणा... ते आचार्य अत्रे... कॉम्रेड डांगे... एस. एम. जोशी... सेनापती बापट... प्रबोधनकार ठाकरे...



दादासाहेब गायकवाड... क्रांतिसिंह नाना पाटील... उद्धवराव पाटील.... दाजीबा देसाई... बापू लाड... भगवानराव सूर्यवंशी... नाशिकचे विठ्ठलराव हांडे... बी. सी. कांबळे... दादासाहेब रूपवते... एक नाही अनेक नेते ( खूप नावे पाठ आहेत... पण त्यासाठी एक पान लागेल... ) आणि तोलामोलाचे अनेक कार्यकर्ते ज्यांनी संयुक्त महारष्ट्र या एकाच ध्येयाकरिता पाच वर्षे आपला संघर्ष जागता ठेवला. त्या पाच वर्षांत कोणी कोणाची जात पाहिली नाही... धर्म पाहिला नाही... निवडणूकीत पैशाला कसलीही किंमत नव्हती... फक्त एकच लक्ष्य.... 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे.... ' एकच गर्जना... त्यामुळेच सारा महाराष्ट्र पेटून उठला. मुंबईचे बी. सी. कांबळे अत्यंत अभ्यासू, विद्वान नेता... त्यांना लोकसभेसाठी अहमदनगर जिल्ह्यातून उभे केले. त्यांनी कॉंग्रेसचे आठरे-पाटील यांना पराभूत केले. मुंबईतील ताडदेवच्या तुळशीवाडीतील नौशेर भरूचा या परशी नेत्याला विधानसभेला जळगावमधून उभे केले आणि ते विजयी झाले. स्वातंत्र्याच्या चळवळीत जे वातावरण होते तेच वातावरण संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत होते. एक-एक सभा लाखा-लाखांची होत होती... आता जशा रात्री १० वाजता सभा संपवाव्या लागतात, तसे बंधन नव्हते. एका रात्रीत तीन-तीन सभा.... तासन-तास वाट बघत बसणारे श्रोते... त्यावेळची पद्धत कशी होती... समजा मुंबईत सभा आहे... तर अमरशेख यांच्या पोवाड्याने सभा चालू व्हायची... आणि अत्रे, डांगे, एस. एम. आले की, अमरशेख पुढे पनवेलच्या सभेला जायचे. सभांचे नियोजनच असे केले होते की, सारा महाराष्ट्र घुसळून निघाला...

या शाहिरांच्या खिशात दमडीही नसायची... कोणतरी कार्यकर्ते... कोणाचीतरी गाडी आणून या सभेतून त्या सभेत, शाहीर मंडळींना घेवून जायचे... त्यांच्या राहण्याची व्यवस्था नाही.... कुठल्यातरी कार्यकर्त्याकडे भाजी-भाकरी खायची... ना गाडी... ना घोडे... एका ईर्षेने पेटलेले हे शाहीर होते. आज कोणाला खरे वाटणार नाही... अमर शेखच्या सभेचा बाज असा होता की, त्या काळात माईक नसलेल्या सभेत लाख माणसांपर्यंत पोहोचेल असा पहाडी आवाज... शाहीर अमरशेख यांचा तो आवेष.... तो सोगा... डोक्यावरती केसाची झुल्फ... हातात डफ... तो हवेत उंच फडकवलेला हात...

**१) 'जाग मराठा... आम जमाना बदलेगा...'**
**२) जनतेच्या सत्तेची ज्योत जागती...**
**गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती...**
**भिन्न धर्म जातीची सर्व बंधने**
**तोडुनिया एक जीव जाहली मने**




**लोक युगासाठी जेथे रक्त सांडती**
**गर्जा संयुक्त महाराष्ट्र भारती...**

अशी कितीतरी गिते आज सागता येतील. आज अमरशेख यांचा तो दणदणीत आवाज कानात घुमतो आहे... कोणाला खरे वाटणार नाही... तीन-तीन कंदिल लावून लाखा-लाखांच्या सभा आणि माईकशिवाय गर्जणारे अमर शेख आज असे डोळ्यांसमोर येत आहेत. त्याला साथ देणारे त्याचे सहकारी... त्यांना संयुक्त महाराष्ट्र झाल्यावर काही मिळालेले नाही... त्यांना कोणी विचारलेही नाही. त्यांना 'महाराष्ट्र भूषण' द्यावा, असे कुणाला वाटले नाही. एखादा शाहीर रक्त ओकला असता... महाराष्ट्रासाठी त्यांनी जीव ओतून हे जे काही काम केले त्याला तोड नाही. अमरशेख नुसतेच शाहीर नव्हते... ते कवीही होते... 'कलश' हा त्यांचा ४० कवितांचा संग्रह. त्याला आचार्य अत्रे यांची पन्नास पानांची प्रस्तावना... सात रस्ता येथील शिरीन टॉकीज जवळील एका चाळीतील एका खोलीत त्यांचा संसार... पत्नी हिंदू.... त्यांनी कधी जात पाहिली नाही... धर्म पाहिला नाही... महाराष्ट्र धर्माचाच जयजयकार केला म्हणूनच ते आपल्या कवितेत लिहू शकले....

**'या पर्वतराजी कसल्या....**
**करवतीच तापवलेल्या**
**महाराष्ट्राभोवती पसरल्या**
**अरीसेना ज्यांना चिरल्या....'**

या कवितेतील 'चिरल्या' हा शब्द ज्या ठसक्यात अमरशेख उच्चारायचे, तो शब्द आजही कानात तापल्या तेलासारखा चिर-चिर केलेला जाणवतो.. असे हे अमरशेख एका भीषण अपघातात त्यांचा अंत व्हावा... महाराष्ट्राला त्यांचा विसरही पडला.

दुसरे आमचे आण्णाभाऊ साठे. केवढा महान कवी... महान लेखक... संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात अमरशेख आणि आण्णाभाऊ गर्जत होते. आण्णाभाऊंची गावाकडे राहिलेली 'मैना' आणि त्यांच्या जीवाची काहिली... पण, ही कविता केवळ रोमान्सकरिता नव्हती.... त्याच्या पुढचे शब्द.... ही मुंबई कोणाची....श्रमणाऱ्या कामगाराची की... शेवरलेटवाल्या गाडीच्या मालकाची... आण्णाभाऊंचे ते तिखट शब्द भेदून जात होते आणि आमचा नारायण सुर्वे... त्याचं ते गीत...

**डोंगरी शेत माझं... मी बेणू किती...**

सकाळी भोंगा झाला की, सारी मुंबई कामाला लागायची... संयुक्त महाराष्ट्राचा लढा या मुंबईत गिरणी कामगारांनी लढवला आणि ग्रामीण भागात उद्धवराव पाटील, क्रांतिवीर नाना पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली शेतकऱ्यांनी लढवला. हुतात्मा स्मारक उभे राहिले... त्यात कामगारही आहे आणि शेतकरीही आहे. आज ६३ वा वाढदिवस समोर आला असताना मन अस्वस्थ होवून जाते. की, ज्या कामगारांनी आणि शेतकऱ्यांनी संयुक्त महाराष्ट्र मिळवून दिला. तो कामगार आणि शेतकरीच ६३ वर्षांत चिरडला गेला आहे. मुंबईतील गिरणी कामगारही चिरडून टाकला.. त्याजागी मॉल आले. मंत्रालयाचाही मॉल झाला. पत्रकारांची दुकानं झाली. महाराष्ट्रासाठी लढलेला शेतकरी आणि कामगार यांना सरकारने वाऱ्यावर सोडले आणि गिरणगावात ओसवालचे टॉवर उभे राहिले.

पवार साहेबांच्या त्या भाषणामुळे आज ते सगळे शाहीर आठवले. ते आत्माराम पाटील आज समोर उभे राहून डफावर थाप मारून गात आहेत..

**'संयुक्त महराष्ट्र उगवतोय...**
**माझ्या सरकारा... खुशाल कोंबडं झाकून धरा..' बेल्लरी बेळगाव... पंढरी पारगाव...**
**बोरी उंबरगाव... राहुरी जळगाव सिन्नर ठाणगाव... पंढरी नानगाव... वऱ्हाडी वडगाव... भंडारा, चांदा सातारा, सांगली... जागृत केलेय दख्खनपुरा.. खुशाल कोंबड झाकून धरा...**

या सगळ्या शाहीरांनी असा महाराष्ट्र घुसळून काढला होता. १५ नोव्हेंबर १९५६ चा फ्लोरा फाऊंटनचा महामोर्चा... २९ सप्टेंबर १९५६ ची द्विभाषिक विरोधी परिषद... लाख लोक उपस्थित होते त्याला. ३० नोव्हेंबर १९५७ चा प्रतापगडचा मोर्चा. १९ डिसेंबर १९५८ चा लोकसभेवर धडकलेला मोर्चा... या सगळ्या मोर्चाच्या अग्रभागी भाड्याने आणलेल्या एका लॉरीत अमरशेख, कॉम्रेड अण्णा भाऊ साठे, आत्माराम पाटील, शाहीर गव्हाणकर आणि हे सगळे पथक तासन तास गात होते.

मोर्चा संपला... आचार्य अत्रे यांनी अमरशेख यांना मिठी मारली... आणि म्हणाले, 'शाब्बास शाहीर... आज छत्रपती शिवाजी महाराज असते तर हातातलं सोन्याचं कडं त्यांनी तुम्हाला बक्षीस दिले असते... आणि साधासुधा शाहीर असता तर रक्त ओकला असता... संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्यात शाहीरांचा वाटा फार मोठा आहे. पण, हे सगळे शाहीर उपेक्षित राहिले. १ ऑगस्ट २०२० रोजी अण्णा भाऊंची जन्म शताब्दी झाली. त्यावेळच्या महाराष्ट्र कॉंग्रेसने कोरोना असताना माझंच अण्णा भाऊंवर ऑनलाईन भाषण ठेवले होते. मलिक्कार्जुन खरगेही त्यावेळी उपस्थित होते. सरकार ठाकरे यांचे होते. मी आग्रहाने सांगितले की, अमरशेख, आण्णाभाऊ यांना मरणोत्तर 'महाराष्ट्- भूषण' द्या. त्यावेळच्या मंत्री वर्षा गायकवाड म्हणाल्या, 'आम्ही केंद्र सरकारला विनंती केली आहे की, त्यांना 'भारतरत्न' द्या.... '

मी ताड्कन म्हणालो, किती भाबड्या आहात तुम्ही... आणि तुमचं सरकार... केंद्र सरकार 'अण्णा भाऊंना भारतरत्न देईल ? तुमच्या हातात जो महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्यासारखा आहे, तो तरी देण्याची दानत दाखवा. अमरशेख, अण्णा भाऊ साठे आणि शाहीर साबळेसुद्दा यांना मरणोत्तर महाराष्ट्र भूषण पुरस्कार द्यायला काय हरकत आहे ? आदरणीय नानासाहेब धर्माधिकारी यांना मरणोत्तरच महाराष्ट्र भूषण पुरस्कार आप्पासाहेबांच्या घरी जावून २००८ साली दिला ना... मग या तीन शाहीरांच्या कुटुंबियांना घरी जाऊन महाराष्ट्र भूषण पुरस्कार द्या.

**कोणाला काहीही पडलेल नाही. लढणारे लढले... मरणारे मेले... खंत एवढीच आहे... संयुक्त महाराष्ट्रासाठी रक्त ओकले कोण... डफ कडाडले कोणाचे ? लढले कोण ? हुतात्मा झाले कोण ? आणि गब्बर झाले कोण ?**

# डॉ. कैलास दौंड यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**सुप्रसिद्ध मराठी ग्रामीण कादंबरीकार, ग्रामजीवनातील वास्तवाचे चित्रण करणारे लेखक- कवी म्हणून प्रसिद्ध असलेले कवी डॉ.कैलास दौंड जन्म (१९७३) यांच्या पानधुई व कापूस काळ या कादंबऱ्या,' उसाच्या कविता,' वसाण, भोग सरू दे उन्हाचा, अंधाराचा गाव माझा, हे कविता संग्रह , एका सुगीची अखेर, हा कथासंग्रह, व तऱ्होळीचं पाणी ललित लेख संग्रह इत्यादी लेखन प्रसिद्ध आहे. लेखनासाठी २५ हून अधिक साहित्य पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. आपल्या कवितेतून वेगवेगळ्या विषयांचे वर्णन करतांना त्यांनी 'गोधडी 'या कवितेतून आई-वडिलांच्या कष्टमय जीवनाचे दारिद्र्याने पोळून निघालेल्या कुटुंबातील नात्यांमधील जिव्हाळ्याचे, व आईच्या माहेरातील आठवणींच्या हृदयस्पर्शी भावनांचे भावस्पर्शी वर्णन केलेले आहे.**

आपल्या 'उसाच्या कविता'या काव्यसंग्रहातील 'गोधडी' ही कविता इयत्ता आठवीच्या बालभारती या पुस्तकात अभ्यासक्रमात घेतलेली कविता आहे .कवितेत कवी म्हणतात,

गोधडी म्हणजेच
***नसतो फक्त चिंध्यांचा बोचका***
***गोधडी म्हणजेच गोधडी असते.***
***मायेलाही मिळणारी ऊब असते.***
***गोधडीला असते अस्तर***
***बापाच्या फाटक्या धोतराचे***
किंवा
***आईला बापाने घेतलेल्या***
***फाटक्या लुगड्याचे***
***आत गोधडीत***

ग्रामीण भागात गरीब परिस्थितीमुळे घरात अंथरण्यासाठी किंवा पांघरण्यासाठी अनेक ठिकाणी गोधडी वापरली जाते. घरातील अनेक जुन्या कपड्यांपासून ही गोधडी शिवली जाते. कवितेच्या वरील ओळींमध्ये सुद्धा कवीने अशाच काही आठवणी गोधडीच्या सांगितल्या आहेत. गोधडी म्हणजे फक्त चिंध्या नसून तिला मायेची ऊब असते. व वडिलांच्या फाटलेल्या धोतराचे अस्तर किंवा आईला वडिलांनी घेतलेल्या फाटलेल्या लुगड्याच्या कापडा पासून ती शिवलेली असते. त्या जुन्या आठवणी सुद्धा त्या गोधडीत असतात. पुढे कवी म्हणतात,

***अनेक चिंध्या असतात***
***बसलेल्या दाटीवाटीनं***
***आईनं दटावून बसवलेल्या***
***तेव्हा त्या फक्त चिंध्याच नसतात***
***त्यात असतो***
***मामानं घेतलेला भाच्याचा***
***जीर्ण कुडता***
***माहेरातून आलेलं***
***आईच्या लुगड्याचं पटकुर***
***आणि***
***पहिल्या संक्रांतीला***
***बानं घेतलेलं_***
***आईनं असंख्य ठिगळं लावलेलं***




***तिचं लाडकं लुगडं***

अनेक जुन्या कपड्यांच्या तुकड्यांपासून आईने गोधडी बनवलेली असते. त्यासाठी तिने कधीतरी भावाने घेतलेल्या लेकराचा कुडता, माहेरी तिला घेतलेल्या फाटक्या लुगड्याचे कापड, तसेच वडिलांनी तिला घेतलेल्या पहिल्या संक्रांतीच्या असंख्य ठिगळं लावलेल्या तिच्या लाडक्या लुगड्याचा वापर केला होता. असे वर्णन कवी करतात. ग्रामीण भागात गरीब परिस्थितीमुळे अनेकदा स्त्रियांना प्रत्येक संक्रांतीला किंवा सणावाराला नवीन लुगडे घेत नाहीत. परंतु प्रत्येक स्त्रीला विवाह नंतर येणाऱ्या पहिल्या संक्रांतीला मात्र आवर्जून लुगडे किंवा साडी घेण्याची पद्धत आजही ग्रामीण भागात आहे. त्यामुळे या लुगड्याशी त्या स्त्रीचं एक वेगळंच जिव्हाळ्याचं नातं असतं. त्यामुळेच कवी आईच्या लुगड्याविषयी "तिचं लाडकं लुगडं "असं वर्णन करतात. पहिल्या संक्रांतीला लुगडं घेतल्यानंतर पुढे अनेक संक्रांतीला लुगडं मिळतच असं नाही. त्यामुळे त्या लुगड्याची अप्रूवाई काही वेगळीच असते. पुढील ओळीत कवी म्हणतात,

आणि
***बाच्या कोपरीच्या बाह्या***
***आईनं ते सगळं***
***स्मृतीच्या सुईनं***
***शिवलेल असतं त्यात***
***म्हणून गोधडी म्हणजे***
***नसतो चिध्यांचा बोचका***
***ऊब असते ऊब!***

आई बरोबरच वडिलांनाही कपडे फाटले तरीही नवीन कपडे घेता येत नाहीत. आर्थिक विवंचनेत इतर गोष्टींची जुळवाजुळव करतांना स्वतःसाठी काहीच घेता येत नाही. किंवा आई वडील सुद्धा स्वतःच्या इच्छा ,हौशी, आपल्या लेकरांपुढे मनातच ठेवतात. म्हणून कवींनी वर्णन केल्याप्रमाणे वडिलांच्या कुडत्याच्या बाह्या सुद्धा आईने स्मृतीच्या सुईने गोधडीत शिवलेल्या आहेत. त्यामुळे गोधडी म्हणजे फक्त चिंध्यांचा बोचका नसून ती हवीहवीशी वाटणारी मायेची ऊब असते. व त्यामुळेच गोधडी कवीला जिव्हाळ्याची वाटते.गोधडी च्या रूपाने कौटुंबिक नात्यांमधील आठवणींचा गोफ कवीने विणला आहे. गोधडी म्हणजे मायेचा स्पर्श, गोधडी म्हणजे आई वडिलांच्या कष्टमय जीवनाचे प्रतीक, गोधडी म्हणजे केवळ पांघरून नसून ती दारिद्र्याने पोळलेल्या कुटुंबाला मायेची ऊब देणारी एक चादर आहे. अशा आशयाचे वर्णन कवी करतात.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बुद्ध धम्म



चित्र : बाबूराव पाटील

आधुनिक केसरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेल्या राष्ट्रनिर्माणाच्या लढ्यातून भारत नावाच्या अखंड राष्ट्राची निर्मिती झाली. सुवर्ण भारतानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रजासत्ताक भारताची निर्मिती करून देशाला प्राचीन भारताचे वैभव प्राप्त करून दिले. पुष्यमित्रशगाच्या प्रतिक्रांतीनंतर संपूर्ण भारतीयांना शिक्षण शास्त्र आणि अर्थव्यवस्थेपासून वंचित ठेवण्यात आले होते . पुष्यमित्रशुंगाच्या प्रतिक्रांतीनंतर संपूर्ण भारतीयांना शिक्षणशास्त्र आणि अर्थव्यवस्थेपासून वंचित ठेवण्यात आले होते. या देशाची मूळ बौद्ध संस्कृती नष्ट करण्यासाठीच हे कट कारस्थान रचण्यात आले होते. परंतु बाबासाहेबांच्या क्रांतीमुळे या देशाने हजार वर्षांपूर्वी गमावलेले सर्व काही परत मिळवले. प्रजेची संकल्पना संपुष्टात येऊन नागरी व्यवस्था निर्माण झाली.**

राजांच्या वर्चस्वाखाली वावरणारी प्रजा स्वतंत्र नागरिक झाली. आपला प्रमुख कोण असावा हे ठरवण्याचे मूलभूत अधिकार नागरिकांना मिळाले. बुद्धकालीन लोकशाही व्यवस्था निर्माण झाली. सुवर्ण भारताला गिळंकृत करून भारतीयांचे अस्तित्व शून्य करणारी हजारो वर्षाची परकीय व्यवस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रजासत्ताक भारतात परावर्तित केली. भारतीय लोकशाहीला पुनर्जीवित केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या राष्ट्रनिर्माणाच्या लढ्यातील त्रीसूत्री लक्षात घेतली तर, आपल्याला हे कळेल की डॉ. बाबासाहेबांनी कोणत्याही एका धर्माला नष्ट करून नवीन कुठल्या धर्माची स्थापना केली हे सत्य नाही. देशातील अनेक विद्वानांनी अशी मांडणी केली आहे की, बाबासाहेबांनी हिंदू धर्म नष्ट केला .आणि अस्तित्वात बौद्ध धर्म आणला. हिंदू हा धर्म नाही तो एक संप्रदाय आहे आणि बौद्ध हा धर्म नाही तर ते एक राष्ट्रीयत्व आहे. ते एक जागतिक जीवनमूल्य आहे .ज्यामुळे जगाला दिशा मिळाली. ते एक जागतिक जीवनमूल्य आहे. जग विज्ञानवादी बनले .जगाच्या विकासाचे पायाभूत तत्त्वज्ञान आहे. जगाचे अस्तित्व बुद्धामुळे आहे. बौद्धतत्त्वज्ञान हे जगाच्या उन्नतीचे सूत्र आहे. बुद्धांनी जगाला दिलेले जीवनसूत्र पृथ्वी ग्रहावरील एकमेव आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जगातील एकमेव विद्वान होते की ज्यांना जगाने सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून स्वीकारले आहे. त्याचाच अर्थ बाबासाहेबांनी उभारलेले रिपब्लिकन आंदोलन कुठल्याही एका जाती समूहाच्या उद्धार करण्यासाठी अथवा त्यांना अधिकार देण्यासाठीचे नव्हते तर ते सुवर्ण भारताच्या पुनःनिर्मानाचे होते, हे समजून घ्यावे लागेल. डॉ. बाबासाहेबांनी भगवान बुद्धच का स्वीकारला ही भारतीयांना नीटपणे अजूनही समजले नाही . भगवान बुद्धाच्या अनुयायांना ते उमजलेले नाही. कारण बुद्ध हे धर्म संस्थापक नाही तर जगाला विकासाच्या दिशेने घेऊन जाणारा पृथ्वीगृहावरील पहिला वाहिला मानवी अविष्कार आहे.बुद्धाने पृथ्वीवरील माणसांना जे दिले ते आजवर कोणीच दिले नाही . बुद्ध हा जगातील पहिला महापुरुष आहे की , ज्याने पहिल्यांदा पृथ्वी ग्रहावरील माणसांच्या विकासाचा मार्ग सांगितला . निसर्गातील गुढ ज्ञानापर्यंत पोहोचून मानवी विकासाचा शोध लावला. म्हणून बुद्ध हा जगाचा मार्ग दाता ठरलेलाआहे. त्यामुळेच बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाचा मार्ग स्वीकारला .नि भारताला दुष्ट विचार प्रवाहाच्या निबंधातून मुक्त केल. आणि लोकशाहीवादी प्रजासत्ताक भारताची निर्मिती करून भारतीयांना स्वभान दिले व अस्तित्वाची जाणीव करून दिली. त्यालाच देशप्रेम ,राष्ट्रवाद ,देशभक्ती असे म्हटले जाते बाबासाहेबांच्या प्रती सर्व भारतीयांनी कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. कारण त्यांनी आपल्याला जगाला मार्ग दाखवणाऱ्या एका जागतिक विचारधारेचे उपासक बनवले. भारत हा जगद्गुरु आहे .भारत देश जगाचा मार्ग दाता आहे. हा स्वाभिमान व राष्ट्राभिमान प्रत्येक भारतीयांमध्ये जागृत केला.भारतीय नागांना सिंहाची आयाळ दिली .सिंह हा भारताचा राष्ट्रीय प्राणी आहे. आणि तोच सुवर्ण भारताचा प्रतीक ही आहे. हे राष्ट्रप्रेम प्रत्येकाच्या मनामनात रुजले पाहिजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोंबर, 1956 रोजी बौद्ध धम्माचा स्वीकार केला. असे वर वर वाटत असले तरी, नीतिमान ,मूल्याद्विष्टित व तर्कशुद्ध जगण्याची त्यांनी एक भारतीय विचारधारा दिली. ज्या विचारधारेने संपूर्ण जगाला वैभव संपन्न बनवले. हे वैदिकांच्या प्रभावाखाली वावरणाऱ्या काहींना समजले नाही . त्याची खंत वाटते .बाबासाहेबांचे हे राष्ट्रीय कार्य अनेकांना पचले नसल्याचे लक्षात येते . सुवर्ण भारत बुद्ध तत्त्वज्ञान हे जगाचे प्रेरणास्त्रोत आहे . ही जगाची खरी ओळख आहे. परंतु दुःख याचे वाटते की, बाबासाहेबांना समजून घेणारे त्यांच्या राष्ट्रीय कार्याला नीटपणे मांडणारे विद्वत जन साहित्यिक विचारवंत जन्माला आले नाहीत . बाबासाहेबांविषयी त्यांच्या राष्ट्रनिर्माणाच्या कार्याविषयी लेखक विद्वानांमध्ये मोठा संभ्रम आहे.,भीती आहे.भारतीयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बुद्धाविषयी एक नकारात्मकता रुजवलेली आहे. त्यामुळे त्यांना सत्य स्वीकारण्याची भीती वाटते. भारतातील सर्व प्राचीन मंदिरांचे संशोधन झाले, तर भारताची मूळ संस्कृती जगाला कळेल. ही भीती वाटते. चुकून कपोल- कल्पित राम जन्मभूमीचे वास्तव सर्वांना माहीत असताना देखील भीतीपोटी सर्वांनी ते स्वीकारले .बुद्धगया ,कुशीनगर याविषयी बोलण्याचे- लिहिण्याचे धाडस कुठल्याही विचारवंतात राहिले नाही .तिरूपती येथे असलेली बुद्ध मूर्ती लोकांसमोर आणली जात नाही . 84 सम्राट अशोकाने बांधलेल्या 14,000 स्तूपांचा शोध भारतीयांना घ्यावासा वाटत नाही. या मागे बुद्धभेद संभ्रम आणि भीती हेच मूळ कारण आहे. यात शंका नाही . डॉ. बाबासाहेबांनी ही भूमिका स्पष्टपणे घेतली . मात्र त्यांच्या अनुयायांना समर्थकांना ही भूमिका घेता आली नाही. ते लाभार्थ्यांच्या भूमिकेतच राहिले . आजही त्यांच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही. हे स्पष्टपणे जाणवते. आज जे काही चाललं आहे त्यात आंबेडकरवाद !देशभक्ती ,राष्ट्रीयत्व कुठे आहे ? शील कुठे आहे ? अष्टांगिक मार्ग कुठे आहे ?पारमिता कुठे आहेत ? जे चालू आहे ते स्वहिताचे ,स्वकल्याणाचे आणि स्वार्थासाठी आहे. हे ज्यांना आरशासमोर उभे राहण्याचे धाडस आहे त्यांना पटू शकेल. आपली सुरुवात कशी होती आणि आपला शेवट कुठे होतोय. त्याची जाणीव प्रत्येकानी ठेवली पाहिजे. भूमिका ही तडजोडीचीच असेल , देखावा करण्याचीच असेल , फक्त अस्तित्व दाखवण्याचीच असेल, तर माझ्या या भूमिकांना काहीच अर्थ उरणार नाही . पण बाबासाहेबांसारखे काही करायचेच असेल. त्यांच्या राष्ट्रीय भूमिकांना पुढे घेऊन जायचेचं असेल .तर बुद्ध हा 'धर्म' नाही हे समजून घ्यावे लागेल .बुद्ध तत्त्वज्ञान आहे . हे निसर्गाची उपासना करून मिळवलेला माणसांच्या उन्नतीसाठीची एक प्रगाढ अशी विचारधारा आहे . मानवी राष्ट्राभिमान विकासाचा पहिला - वाहिला अविष्कार आहे. मानवी जीवनमूल्यांची संहिता आहे . त्यांनी निर्माण केलेल्या या मानवी मूल्यांना अनुसरणाऱ्या ,आचरणात आणणाऱ्या ,उपासकांना बौद्ध म्हटले जाते .बौद्ध हा धर्म नव्हे तर पृथ्वी ग्रहावर जन्माला येणारा प्रत्येक मानव या मूल्यांनीच विकसित होतो .बुद्धीचा आणि मनाचा विकास झाला तरच नवनवीन शोध लागण्याची प्रक्रिया गतिमान होऊ शकते. मानवाच्या विकासाचे निसर्गातील गुड शोधण्याचा पहिला मार्ग बुद्धांनीच प्रथम जगाला दिला.

डॉ. सिद्धोधन, बिलोली
9420671750

# महिला कुस्तीपटूंवर पोलिसी बळाचा वापर : महेश तपासे

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** महिलांचा सन्मान आणि सुरक्षा करुन सरकार चालवू असे आश्वासन नरेंद्र मोदींनी २०१४ मध्ये देशातील जनतेला दिले होते परंतु आपल्यावर झालेल्या अत्याचाराविरोधात आंदोलन करणाऱ्या महिला कुस्तीपटूंवर पोलिसी बळाचा वापर करून आंदोलन चिरडण्याचा दिल्लीत जंतरमंतरवर जो प्रकार झाला त्याचा निषेध राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी केला आहे. गेले दहा दिवस दिल्लीच्या जंतरमंतरवर महिला कुस्तीपटू आंदोलनाला बसल्या आहेत. काल मध्यरात्री पोलिसांनी पाऊस सुरु असताना लाठीचार्ज केला आणि शिवीगाळ करून आंदोलनाचा अधिकार मोडण्याचा प्रयत्न केंद्रातील भाजप सरकारच्या पोलीसांनी केला याबद्दल महेश तपासे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या महिला कुस्तीपटूंना न्याय मिळावा, त्यांच्या प्रश्नांना वाचा फुटावी आणि त्यांच्या मागण्यांवर यथोचित कारवाई व्हावी अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसची आहे असेही महेश तपासे म्हणाले. देशातील बेरोजगारीचा एक डेटा प्रसिद्ध झाला असून त्यात चार महिन्यांचा उच्चांक बेरोजगारीने मोडला आहे. दरवर्षी दोन कोटी रोजगार निर्माण करु, 'अच्छे दिन' आणू असे आश्वासन नरेंद्र मोदी यांनी दिले होते. परंतु दिवसेंदिवस पाहिले तर बेरोजगारीचा आलेख वाढतच चालला आहे. कनिष्ठ पदावर उच्चशिक्षित लोक येऊ लागले आहेत. याचा अर्थ बेरोजगारी आटोक्यात आणण्यामध्ये भाजपसरकार फेल ठरले आहे असा आरोपही महेश तपासे यांनी केला आहे. या देशातील बेरोजगारी पंतप्रधान नरेंद्र मोदी दूर करु शकत नाहीत त्यामुळे २०२४ च्या निवडणुकीत देशातील सुशिक्षित तरुण बेरोजगार हा मोदींच्या भुलथापांना बळी न पडता भाजपला मतदान करणार नाही असा दावाही तपासे यांनी केला आहे.

# मोबाइल हिसकावणारे चोरटे पोलिसांच्या जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** रात्रीच्या वेळी नागरिकांना धमकावून मोबाइल संच हिसकावणाऱ्या चोरट्यांना पोलिसांनी अटक केली. चोरट्यांकडून दोन दुचाकींसह ११ मोबाइल संच जप्त करण्यात आले. रईस जाकीर शेख (वय २१, रा. बोपोडी), रोहित रणवीरसिंग चिडार (वय २१, रा.जयजवान नगर येरवडा) अशी अटक करण्यात आलेल्या चोरट्यांची नावे आहेत. मोबाइल चोरीच्या गुन्ह्यात सामील असलेल्या अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपी शेख, चिडार आणि अल्पवयीन साथीदारांनी रात्रीच्या वेळी नागरिकांना धमकावून त्यांचे मोबाइल संच हिसकावले होते. आरोपी कल्याणीनगर भागात थांबल्याची माहिती पोलीस नाईक अमजद शेख आणि अनिल शिंदे यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून आरोपींना ताब्यात घेतले. आरोपींनी येरवड्यातील आगाखान पूल परिसर, वडगाव शेरी, अप्पा बळवंत चौकात मोबाइल संच हिसकावल्याची कबुली दिली आहे.




# कासार समाजाचा वधू-वर परिचय मेळावा

आधुनिक केसरी न्यूज



**सोलापूर :** जैन कासार विकास प्रतिष्ठान व जैन कासार समाज संस्थेच्या वतीने आयोजित केलेल्या कासार समाज वधू-वर मेळाव्यात उपस्थित वधू-वरांना व पाचशेच्या वर पालकांना प्री-वेडिंग शुटिंग न करण्याबाबत शपथ देण्यात आली. हिराचंद नेमचंद धर्मशाळेत झालेल्या कासार समाज वधू-वर पालक परिचय मेळाव्यात महाराष्ट्र तसेच कर्नाटक राज्यातील ३५० वधू-वर उपस्थित होते. पन्नास वर पालकांनी आपल्या पाल्यांचा परिचय करून दिला. यावेळी व्यासपीठावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष हुकुमचंद हेसे, जैन कासार संस्थेचे अध्यक्ष पोपटलाल डोर्ले (सांगली), उपाध्यक्ष विजयअण्णा कासार (पुणे), सो.क्ष. कासार समाजाचे अध्यक्ष शरद भांडेकर, कासार विचार मंचचे ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, उपाध्यक्षा माणिकताई व्यवहारे, स्वागताध्यक्ष संजय ऊर्फ पप्पू कंदले, गोविंदराव अंधारे, प्रा.सुभाष दगडे (पुणे) यांची प्रमुख उपस्थिती होती. जैन कासार समाज संस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र येवनकर (बार्शी) यांच्या हस्ते या मेळाव्याचे उद्घाटन झाले.

यावेळी उपस्थित वधू-वर व पालकांना 'श्रमण संस्कृतीतील संस्कार व मूल्यांचा रक्षणासाठी आम्ही लग्नापूर्वी व्हिडिओ शुटिंग किंवा फोटो शुटिंग (प्री-वेडिंग) करणार नाही' अशी शपथ देण्यात आली. यावेळी बोलताना अध्यक्ष हुकुमचंद हेसे म्हणाले, परिचय मेळावा होणे काळाची गरज असून अशा मेळाव्यातून एकमेकांशी संवाद साधता येतो व नोकरीनिमित्ताने दूरवर असलेल्या अनेकांना एकाच ठिकाणी भेटता येते व परिचयही होतो. यातून लग्न जुळण्यास मदत होते व खर्चामध्येपण बचत होते.

या मेळाव्यासाठी महाराष्ट्र, कर्नाटकमधून वधू-वर व पालक उपस्थित होते. प्रारंभी स्वागताध्यक्ष संजय कंदले यांनी सर्वांचे स्वागत करून प्रास्ताविक केले. दीपप्रज्वलनाने मेळाव्यास प्रारंभ झाला. मेळावा यशस्वी करण्यासाठी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष बाबुराव तंगा, कांतीलाल नळे, महावीर दुरुगकर, अभिनंदन अगरथडे, सचिन पाटील, महावीर लाळे, विक्रांत बशेट्टी, राजेश मोहोळकर, महेश नळे, राजू सासवडे आदींनी परिश्रम घेतले.

दानशूर व्यक्तींचा गौरव

या मेळाव्यास व चिंतामणी पार्श्वनाथ शैक्षणिक फंडास मदत करणाऱ्या विलास कंदले, सुनील विभुते, राजेंद्र येवनकर, उमेश सगरशेट्टी, मनिषा निनगूरकर, प्रा.सुभाष दगडे यांचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.






# जड वाहतूक बाहेरुन वळवा

## आरपीआय आठवले गटाकडून रास्ता रोको आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकीन :** गेल्या अनेक अपघातानंतर बिडकीन येथील अनेक घटना चा आढावा घेत अखेर रीपब्लीकन पार्टी ऑफ इंडीया [ आठवले ] गटाचे प्रदेश अध्यक्ष अमोल नरवडे यांनी . राज्य महा. मार्ग विभागाच्या विभागीय कार्यालयात गत आठवडा पुर्वी रीतसर निवेदन दिले होते. त्यात नमुद असे की इसारवाडी फाटा ते डी.एम. आय. सी. एरियातून नगर महामार्ग ते जालना महामार्ग येथे या भागातुन टोलनाका वाचवण्या साठी व शार्टकट म्हणून हा मार्ग जड वाहतुकीसाठी सोईचा असल्याने मोठ्या वाहनांची वाहतूक कमालीची वाढ झाल्याने . निलजगाव फाटा ते शेकटा फाटा येथुन वाहनाची वर्दळ जास्त वाढल्याने बिडकीन शहर अंतर्गत या वाहतुकीने गांवकऱ्याचे जीवीत हानी मोठया प्रमाणात वाढल्या असल्याने परयायी मार्गाची सुवीधा करावी व शेकटा फाटा ते पैठण रोड वरुन एका बाजूने पर्याय करावा म्हणजे नियोजन केल्यास वर्दड दाट होणार नाही वारंवार ट्राफीक जाम होते व अपघातात वाढ होणार नाही व रस्ता सुरक्षीत राहील. असे लेखी निवेदन दिले असताना सुध्दा संबधीत विभागाने दखल घेतली नसल्याने. निवेदनात नमुद पैकी जर सात दिवसांत प्रकरणाचा निर्वाळा केला नाही तर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल संबधीत विभागाने कोणतीच हालचाल न केल्याने आज ठरल्या प्रमाणे आंदोलन करण्यात आले व जर पुन्हा हे काम होत नसेल तर या नतंर पुन्हा मोठया प्रमाणात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. आज झालेल्या रास्ता रोको आंदोलनाचे नेतृत्व आरपीआय नेते अमोल नरवडे व त्याचे सहकारी पदाधीकारी जगन्नाथ साळवे, गौतम वाकडे, गौतम सोनवणे,गोविंदा बर्फे, मिलिंद नरवडे, रवींद्र नरवडे,अजिनाथ घाटविसावे, किरण, घाटविसावे, भिमराज ससाणे, सचिन धोत्रे, रहीम शेख, सुनील साळवे, राजेश नाडे, पंडित गिऱ्हे,नरेश रोडगे, राहुल गिऱ्हे, लाला पठाण,आकाश नरवडे, रामनाथ जगदाळे, रईस चाऊस, शब्बीर शेख, रेखाबाई वाघमारे, मंदाबाई नरवडे, मंगलबाई गिऱ्हे, भास्कर थोरात, आदित्य थोरात, शुभम पाचारणे, जितू पोटफोडे, सनी बर्फे, अक्षय वाकडे,राजू मन्सूरी, समीर शेख,बाबासाहेब गिऱ्हे, आदी असंख्य कार्येकर्ते गावकरी मंडळी उपस्थित होते. बस स्टॅंड समोर हे रास्ता रोको आंदोलन केल्याने व आज बिडकीन चा आठवडी बाजार असल्याने काही काळ. दोन्ही बाजूने वाहतुक थांबली होती. बिडकीन पोलीस ठाणे प्रभारी गणेश सुरवसे व पो. उ. नि. मोरे. व बीट जमादार सतीष बोडले, राहुल बल्लाड यांनी सर्वांना ताब्यात घेतले व नतंर सोडून दिले.

# रमेश शिंदे यांना गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील



कर्मचारी रमेश काकासाहेब शिंदे यांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. राज्याचे कामगारमंत्री सुरेश खाडे यांनी सोमवारी राज्यातील विविध आस्थापनांवरील 51 कामगारांना हे पुरस्कार जाहीर केले. त्यात शिंदे यांचा समावेश आहे.

रोख 25 हजार रुपये, मानपत्र, स्मृतीचिन्ह व पदक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या यशाबद्दल महावितरणचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले, मुख्य अभियंता सचिन तालेवार, अधीक्षक अभियंता प्रवीण दरोली, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी विश्वास पाटील यांनी शिंदेंचे अभिनंदन केले आहे. शिंदे यांना फेब्रुवारीमध्ये मिरज येथे झालेल्या कामगार साहित्य संमेलनात कामगार कल्याण मंडळातर्फे वैचारिक लेखन व काव्य लेखनासाठी राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आलेला अहे. तसेच 1 मे 2023 रोजी महावितरणच्या परिमंडल कार्यालयातर्फे त्यांना सहव्यवस्थापकीय संचालक डॉ.मंगेश गोंदावले यांच्या हस्ते विशेष गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गतवर्षी महावितरणतर्फेच त्यांना उत्कृष्ट तांत्रिक कामगार पुरस्कारही मिळालेला आहे. शिंदे हे सध्या हिवरा 33 केव्ही उपकेंद्रात यंत्रचालक म्हणून कार्यरत आहेत. ते मूळचे छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील वाहेगाव देमनी येथील रहिवासी आहेत. महाविद्यालयीन स्तरावर आपल्या अभिनय कौशल्याने विविध युवक महोत्सव, राष्ट्रीय आंतरविद्यापीठ स्पर्धा गाजवणाऱ्या शिंदेंनी महावितरणसह कामगार नाट्य स्पर्धा व राज्य नाट्य स्पर्धांतही विविध पारितोषिके पटकावलेली आहेत. उत्कृष्ट व्याख्याता, निवेदक, सूत्रसंचालक असलेल्या शिंदेंचे 'उद्योगाचा कणा : कामगार आणि वास्तव' हे पुस्तक प्रकाशित झालेले असून. कवितासंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर आहे. कामगार चळवळीतही ते सक्रीय आहेत.

# तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना न्यायालकडून दिलासा..

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पैठणचे तत्कालीन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्याविरोधात करण्यात आलेल्या आरोपांच्या अनुषंगाने चौकशी करून दोन



महिन्यांत अहवाल सादर करण्याच्या पैठणच्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांच्या आदेशाला खंडपीठाने अंतरिम स्थगिती दिली आहे. शेळके यांच्या फौजदारी याचिकेची याच प्रकरणातील याचिका क्र. ४०० / २०२३ सोबत २१ जून २०२३ रोजी एकत्रित सुनावणी होणार आहे. एका सामाजिक कार्यकर्त्याने शेळके यांच्या विरोधात भ्रष्टाचार केल्याचा आणि पुरावे नष्ट केल्याचा आरोप केला होता. या संदर्भातील तक्रारीची जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घेतली नसल्याने, तक्रारदाराने सदरील प्रकरणाची खाजगी तक्रार पैठणच्या प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांकडे केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने न्याय दंडाधिकाऱ्यांनी गुन्हा दाखल करून दोन महिन्यांत चौकशी अहवाल सादर करण्याचा आदेश दिला होता. या आदेशाला शेळके यांनी ॲड. श्रीकांतजी कवडे यांच्यामार्फत खंडपीठात आव्हान दिले आहे. याचिकेवरील प्राथमिक सुनावणीवेळी ॲड. श्रीकांतजी कवडे यांनी नमूद केले की, शेळके सध्या अंबड येथे तहसीलदार म्हणून कार्यरत आहेत. एका उच्चपदस्थ शासकीय कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यापूर्वी तक्रारदाराने वरिष्ठांची परवानगी घेणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात अशी परवानगी घेतलेली नाही. केवळ राजकीय आकसापोटी आणि केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने तक्रार दाखल केली आहे. उभय पक्षांच्या युक्तिवादानंतर खंडपीठाने वरीलप्रमाणे अंतरिम आदेश दिला. सदरील प्रकरणांमध्ये शासनातर्फे सहायक सरकारी वकील पी.व्ही. डिग्गीकर काम पाहत आहेत.

# घरासमोरून गांजा ठेवून खोट्या गुन्ह्यात अडकविण्याचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** शिरपूर येथे अंमली पदार्थाच्या खोट्या गुन्ह्यात पोलिसांनी षडयंत्र रचल्याचा हमाल युनियनचे अध्यक्ष असलेले डॅनी चांदे यांचा आरोप.यातील दोषी पोलिसांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली असून यासाठी अन्नत्याग आंदोलनही सुरु केले आहे. यासंदर्भात डॅनी चांदे यांनी पत्रकारांना म्हटले आहे की, दि . २४ मार्च २०२३ रोजी त्यांच्या घरी सायंकाळी काळ्या रंगाच्या स्प्लेंडर गाडीवरुन दोन व्यक्ती आले. त्यांच्या तोंडावर रुमाल बांधलेले होते यापैकी एकाने खाली उतरुन त्यांच्या घराच्या ओट्याजवळ एक पिशवी ठेवली. यावेळी चांदे यांच्या भाडेकरूने विचारणा केली असता शामभाऊंनी पिशवी ठेवायला लावलेली आहे ' असे म्हणत दोघांनी तेथून पोबारा केला. थोड्याच वेळात तेथे शिरपूर शहर पोलीस ठाण्याचे चार पोलीस कर्मचारी आलेत . त्यांनी सदर पिशवी उघडून त्यातील गांजा दाखवला. अन् डॅनी चांदे यांच्याबद्दल विचारणा केली. यासंबंधी परिवाराकडून फोन येताच डॅनी चांदे घरी आले. गांजा कुठून आणला याबाबत चांदेनाही पोलिसांनी विचारले . परंतु , सर्व सत्यता सांगितल्यानंतर पोलीस ती आपल्याला खोट्या पिशवी घेवून निघून गेलेत. यानंतर गुन्ह्यात अडकविले जात असल्याचे लक्षात आल्याने डॅनी चांदे यांनी जिल्हा पोलीस अधिक्षकांसह जिल्हाधिकाऱ्यांना वेळोवेळी निवेदन दिले . डॅनी चांदे २७ मार्च त्यानंतर १८ एप्रिल रोजी संबंधित चार पोलिसांविरुद्ध तक्रार केली आहे. परंतु, यावर कुठलीही कार्यवाही न झाल्याने डॅनी चांदे यांनी आमरण उपोषण सुरु केले आहे. जोवर चार संशयित पोलिसांवर कारवाई होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरुच राहणार असल्याचे डॅनी यांनी सांगितले.



# जम्मनवाडी येथे राजपूत मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुक्यातील जम्मनवाडी येथे गुरुवार रोजी चि.सौ.का. आराध्या व चि,दिलीप बहूरे यांच्या शुभ विवाहात भागवत बिघोत यांच्या मार्गदर्शनखाली वैजापुर येथून माजी शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत,चरणसिंह काकरवाल, पारस बहूरे, संतोष गोमंलाडू,संजय नागलोत, सुभाष गोंमलाडु यांनी भेट देऊन या विवाह सोहळ्यात जमलेल्या राजपूत/परदेशी समाजाच्या महिला व पुरुषाना छत्रपती संभाजीनगर येथे येत्या१४मे,२०२३रविवार रोजी सायंकाळी ४वाजता आयोजित होणार असलेल्या सकल राजपूत समाज मेळाव्याची माहिती देऊन या मेळाव्यला उपस्थित राहण्या चे आवाहन केले. त्यानी उपस्थीत राहण्याचा संकल्प पण केला. या प्रसंगी जालना जिल्ह्यातून आलेल्या वराडा सोबतच्या मन्डळीनी ही मेळाव्याला उपस्थित राहण्याचा संकल्प केला या प्रसंगी घनःश्याम नायमने, प्रताप गोमंलाडू, राजू जारवाल, उदयसिंग बडीया यानी सहकार्य केले. कारभारी बडीया व जम्मनवाडीच्या युवक कार्यकर्ता यांनी खूप सहकार्य केले.

# श्री स्वामी समर्थ संस्थेचा १० वा वर्धापनदिन सोहळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** श्री स्वामी समर्थ संस्थेचा १० वा वर्धापनदिन सोहळा १,२ व ३ मे २०२३ रोजी भाविकांच्या भरगच्च प्रतिसादात संपन्न झाला. घाटकोपर परिसरातील व बाहेरीलसुद्धा श्री स्वामी समर्थ भक्तांच्या वाढत्या प्रचंड सहभागाने संपूर्ण वातावरण स्वामी समर्थमय झाले होते. पहिल्या दिवशी विभागातून निघालेल्या समर्थ पालखी मिरवणूकीत प्रचंड प्रमाणात भाविकजन सामील झाले होते. रस्त्यारस्त्यावर भक्तगणांनी पालखीचे उत्स्फूर्त स्वागत केले. दुसऱ्या दिवशी इतर अनेक कार्यक्रमानंतर रात्री ८.०० वाजता महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध शास्त्रीय संगीत गायक अजित कडकडे यांचा समस्त संगीतप्रेमी जनतेला व स्वामीभक्तांना अक्षरशः भारून टाकणारा व मंत्रमुग्ध करणारा भक्तिगीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. अखेरच्या दिवशी संध्याकाळी स्थानिक जनतेसाठी स्वामी भंडारा आयोजित करण्यात आला होता. सुमारे पाच हजार भाविकांनी यावेळी प्रसाद ग्रहण करून समर्थांचे आशिर्वाद घेतले. दरम्यान तिनही दिवसात विभागातील अनेक मान्यवर समाजसेवकांनी आपल्या सहकार्यांसह येऊन स्वामी दर्शन व प्रसाद ग्रहण कले. संस्थेचे आदरणीय देणगीदार, घाटकोपर पोलीस दल, महापालिका व इतरही प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी परिसरातील निर्माणाधीन इमारतींच्या रहिवाशी व बिल्डर्स यांनी ही आत्मियतेने सहकार्य केले. आणि शेवटी उल्लेख करावा लागेल तो मठातील निस्सीम सेवेकरी, नियमित भक्तगण, ( यामध्ये स्त्री-पुरुष दोन्ही आले, ) यांनी दिवस रात्र न पाहता अफाट कष्ट उपसले. संस्थेचे पदाधिकारी व इतर मान्यवर सदस्य, सजावटकार यांचाही कार्यक्रमाच्या यशात मोठा वाटा होता. ह्या सर्वांना संस्थेच्या वतीने कोटी कोटी धन्यवाद ! श्री स्वामी समर्थ ह्या सर्वांना उदंड आरोग्यमय यशस्वी जीवन प्रदान करो, हीच मनःपूर्वक सदिच्छा असे संस्थेने व्यक्त केले.

# प्रशासनातील भूमिपुत्रांचा सन्मान हा पत्रकार संघाचा स्तुत्य उपक्रम

## ॲड. उषाताई दराडे : राज्यभर ईद मिलाप कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद-वसंत मुंडे

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** जिल्ह्याची ओळख बदलण्यासाठी सकारात्मक विचारांची गरज आहे. बीड जिल्ह्यातील भूमीपुत्र असलेले जे प्रशासनात अधिकारी म्हणून आहेत ते आपल्या कर्तृत्वाने ही ओळख पुसून एक प्रगतीशिल जिल्हा म्हणून बीडची नवी ओळख निर्माण करत आहेत. अशा विकसनशिल वाटेवर असताना पत्रकार संघाने प्रशासनातील भूमीपुत्रांचा सन्मान करुन योग्य पाऊल उचलत स्तुत्य उपक्रमाचा आदर्श निर्माण केला आहे असे मत माजी आमदार ॲड. उषाताई दराडे यांनी व्यक्त केले. तर पत्रकार संघाच्या माध्यमातून राज्यभर सातत्याने पत्रकारांच्या आणि समाजाच्या हिताचे उपक्रम राबवले जातात. ईद मिलाप या उपक्रमास देखील बीडसह राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा बीडच्या वतीने सोमवार दि. 1 मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून ईद मिलाप आणि प्रशासनातील भुमीपुत्रांचा सन्मान हा सोहळा सायंकाळी सहा वाजता स.मा.गर्गे भवन येथे रंगला. पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली तर ज्येष्ठ संपादक संतोष मानूरकर तसेच आमदार संदीपभैय्या क्षीरसागर यांच्या सुविद्य पत्नी सौ.नेहा संदीप क्षीरसागर, माजी आमदार ॲड. उषाताई दराडे, माजी मंत्री प्रा.सुरेश नवले, माजी आमदार सिराज देशमुख, पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या शुभहस्ते बीड जिल्ह्याचे भुमीपुत्र असलेले प्रशासनातील अधिकारी यांचा सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मानित करण्यात आले. बीडचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुरेश साबळे, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर केकाण, जिल्हा क्रीडा अधिकारी सुहासिनी देशमुख, बीडचे तहसिलदार सुहास हजारे, अंबाजोगाई येथील डाएट विभागाचे अधिष्ठाता शिक्षणाधिकारी विक्रम सारुक, महापारेषणचे कार्यकारी अभियंता वासुदेव लबासे, बीड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अनिरुध्द सानप, जिल्हा जलसंधारण अधिकारी को.मा.निंबाळकर या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी पत्रकार संघाच्या वतीने दिलेला राजयोगी रत्न हा पुरस्कार स्वीकारला. याचबरोबर प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ.एकनाथ पवार आणि सामाजिक कार्यकर्ते चाँद खान करीम खान पठाण यांचे सामाजिक योगदान लक्षात घेऊन त्यांना देखील राजयोगी रत्न या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर ज्येष्ठ पत्रकार उत्तम हजारे यांनी त्यांचे चिरंजीव डॉ.सुजीत हजारे यांनी वैद्यकीय परीक्षेत मिळवलेल्या सुयशाबद्दल पत्रकार संघाने दिलेला विशेष गौरव पुरस्कार स्वीकारला. पत्रकार संघाच्या वतीने आयोजित प्रशासनातील भुमीपुत्रांचा गुण गौरव सोहळा आणि ईद मिलाप कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**हा तमाम क्रीडा प्रेमींचा सन्मान : सुहासिनी देशमुख**

मी राष्ट्रीय खेळाडू म्हणून या जिल्ह्यातच नावारुपाला आले. प्रतिकुल परिस्थितीवर मात करत क्रीडा क्षेत्रामध्ये बीड जिल्ह्याचा नावलौकिक वाढवण्याचा खेळाडू म्हणून प्रामाणिक प्रयत्न केला. सद्यस्थितीत मी बीड जिल्हा क्रीडा अधिकारी आहे. या पदाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील खेळाडुंना चांगले व्यासपीठ आणि योग्यदिशा मिळावी यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न सुरु आहेत. सेवा निवृत्तीचे काही महिने शिल्लक असताना पत्रकार संघाने आज जो राजयोगी क्रीडा रत्न पुरस्कार देऊन गौरवले आहे. हा पुरस्कार प्रातिनीधीक स्वरुपात असला तरी खऱ्या अर्थाने हा सन्मान तमाम क्रीडा प्रेमींचा केला आहे. असे भावोद्‌गार जिल्हा क्रीडा अधिकारी सुहासिनी देशमुख यांनी व्यक्त केले.

**पत्रकार संघाने वैभवशाली वाटचालीतून वसंत बहरत सकारात्मक बातमीतून संतोष निर्माण केला-विक्रम सारुक**

पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, संपादक संतोष मानूरकर पत्रकार संघाच्या माध्यमातून सातत्याने वैभवशाली उपक्रम राबवत जिल्ह्याच्या विकासामध्ये भर टाकण्याचा प्रयत्न करत आहेत. या सामाजिक योगदानामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाचा वसंत बहरत आहे. तर आपल्या सकारात्मक बातमीतुन जिल्ह्याची नवी ओळख निर्माण करण्याची ताकद बीडच्या लेखनीतून होत असल्याने खरा संतोष वाटत आहे. अशी भावना शिक्षणाधिकारी विक्रम सारुक यांनी व्यक्त केली.




# विधिमंडळाचे विशेष अधिवेशन नाही बोलावले तर राज्यभर आंदोलन करु : नाना पटोले

## मुंबईचे महत्त्व कमी करण्याचा भाजपाकडून सातत्याने प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यासमोरील प्रश्नांसदर्भात राज्यपाल रमेश बैस यांची काँग्रेस शिष्टमंळाने भेट घेऊन दोन दिवसीय विशेष अधिवेशन बोलवण्याचे निर्देश राज्य सरकारला द्यावेत अशी विनंती करण्यात आलेली आहे. राज्याच्या हितासाठी राज्यपाल काँग्रेसच्या मागणीचा सहानुभूतीने विचार करतील अशी अपेक्षा आहे. विशेष अधिवेशन बोलावले नाही तर काँग्रेस जनतेच्या प्रश्नांसाठी राज्यभर रस्त्यावर उतरुन तीव्र आंदोलन करेल, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.

प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे, सरकार शेतकऱ्यांना मदत करत नाही, ही मदत तात्काळ मिळावी, बारसू रिफायनरी प्रकल्पासाठी स्थानिक लोकांवर पोलीस अत्याचार करत आहेत. खारघरमध्ये सरकारच्या ढिसाळ नियोजनाने १४ लोकांचे बळी गेले, त्याप्रकरणात अद्याप कारवाई केली जात नाही या व राज्यातील इतर महत्वाच्या प्रश्नावर चर्चा होणे गरजेचे आहे म्हणून दोन दिवसांचे विशेष अधिवेशन घेण्याची मागणी केलेली आहे.

मुंबईचे महत्व कमी करण्याचा भाजपा सरकारकडून प्रयत्न.. मुंबई, महाराष्ट्राचे महत्व कमी करण्याचा डाव भारतीय जनता पक्षाचे दिल्लीतील सरकार सातत्याने करत आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे, जगात मुंबई शहराला महत्वाचे स्थान आहे, सर्व महत्वाच्या आर्थिक संस्था, विविध कंपन्यांची मुख्यालये मुंबईत आहेत, मुंबईचे हे महत्व भाजपाच्या डोळ्यात खुपत आहे. मुंबईतील महत्वाची कार्यालये गुजरातली हलवून मुंबईचे महत्व कमी करण्याचे प्रयत्न सातत्याने केले जात आहेत. बुलेट ट्रेनची गरज नसताना ती मुंबई व महाराष्ट्रावर लादली जात आहे. मुंबईतल्या 'बीकेसी'मध्ये होणारे आंतरराष्ट्रीय आर्थिक सेवा केंद्र गांधीनगरला हलवण्यात आले. पेटंट, डिझाईन आणि ट्रेडमार्कचे ऑफिस दिल्लीला हलवले, नॅशनल मरीन पोलीस अकादमी पालघरहून गुजरातमधल्या द्वारकाला हलवण्यात आली. मुंबईमध्ये हिऱ्यांचा मोठा उद्योग पंचरत्न बिल्डिंगमध्ये होता यातील एक मोठा गट गुजरातला गेला. मुंबई व राज्यातील महत्वाची कार्यालये व प्रकल्प दिल्लीच्या इशाऱ्यावर राज्याबाहेर स्थलांतरीत करण्यात आली. मुंबई गुजरातला नेता येत नाही म्हणून ती उद्ध्वस्त करण्याचा भाजपाचा डाव आहे.

**वज्रमूठ सभांचे फेरनियोजन....**

राज्यात महाविकास आघाडीच्या वज्रमूठ सभांना जनतेचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. छत्रपती संभाजी नगर, नागपूर व मुंबई अशा तीन वज्रमूठ सभा झालेल्या आहेत. पुणे, नाशिक, कोल्हापूर व अमरावती येथे पुढील सभा होणार आहेत. परंतु मागील काही दिवसात वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे. त्यामुळे सभांचे वेळापत्रक बदलण्याचा विचार झालेला आहे, वज्रमुठ सभा रद्द केलेल्या नाहीत. उद्धव ठाकरे व राष्ट्रवादीचे नेते यांच्याबरोबर या विषयावर चर्चा झालेली आहे, लवकरच या सभांचे फेरनियोजन केले जाईल, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी स्पष्ट केले.

# पृथ्वीराज चव्हाण यांचा दावा चुकीचा : महेश तपासे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राष्ट्रवादीचे नेते भाजपला समर्थन देण्यासाठी अमित शहा यांना भेटले अशा ऐकीव माहितीवर काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी वक्तव्य केले ते पूर्ण चुकीचे आहे त्याला कोणताही आधार नाही अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्य मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी पृथ्वीराज चव्हाण यांच्या वक्तव्यावर खुलासा केला आहे. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे पत्रकार परिषद घेत महेश तपासे यांनी पृथ्वीराज चव्हाण यांचा हा दावा खोडून काढला आहे.

राष्ट्रवादीचे विचार सेक्यूलर, समतावादी, समाजवादी असून त्यामुळे भाजपसोबत कोणत्याही प्रकारची तडजोड राष्ट्रवादीची किंवा नेत्यांची नाही किंवा बैठकही झालेली नाही त्यामुळे असे चुकीचे विधान पृथ्वीराज चव्हाण यांनी करु नये असा सल्लाही महेश तपासे यांनी दिला आहे.

२ मे रोजी पवारसाहेबांनी राजीनामा दिला त्यानंतर बऱ्याच वर्तमानपत्रांनी सर्व्हे केला की, महाविकास आघाडीचे काय होणार परंतु त्यांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्रात महाविकास आघाडी एकत्रित, एकदिलाने, एक विचाराने, ताकदीने उभी राहणार आणि महाराष्ट्रातून भाजपला हद्दपार करणार असा स्पष्ट दावा महेश तपासे यांनी यावेळी केला.

बाजार समितींच्या निवडणूका असतील किंवा त्याअगोदर झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका असतील, त्याअगोदर विधानपरिषदेचा लागलेला निकाल लक्षात घेता सगळीकडे महाविकास आघाडीला विजय मिळत आहे. पवारसाहेबांच्या निवृत्तीचा विपरित परिणाम न होता उलट महाविकास आघाडी व देशपातळीवर भाजप विरोधात असलेले लहानमोठे पक्ष एकत्र करण्यात ताकद मिळणार आहे असेही महेश तपासे म्हणाले.

# बालमजुरांची सुटका; दोन संशयितांविरुद्ध गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** जिल्ह्यातील काही भागात बालमजुरी समस्या प्रकर्षाने जाणवत असल्याने बालमजुरीच्या विळख्यात अडकलेल्या बालकांच्या सुटकेसाठी नाशिक ग्रामीण पोलिसांनी पुढाकार घेतला आहे. बागलाण तालुक्यात दोन बालमजुरांची पोलिसांनी सुटका केली असून दोन संशयितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील आदिवासी समाजात असणाऱ्या गरिबीचा फायदा घेत अल्पवयीन मुलांना वेगवेगळ्या उद्योग व्यवसायात गुंतविण्याचे प्रकार सध्या उघडकीस येत आहेत. बऱ्याच ठिकाणी बालकेही घरातील आर्थिक परिस्थिती पाहता अर्थार्जन करुन कुटूंबाला हातभार लावत आहेत. यामुळे बालमजुरीचा विळखा अधिकच घट्ट होत आहे. हा विळखा सुटावा यासाठी नाशिक जिल्हा पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी अधिकारी आणि अंमलदार यांचे विशेष पथक गठित केले आहे.

पथकाने जिल्ह्याच्या आदिवासी भागात तसेच अतिदुर्गम वाड्या, वस्त्या तसेच गावांना भेटी देत स्थानिक पोलीस पाटील, आदिवासी समाजातील प्रतिष्ठित नागरिक, सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य यांची मदत घेत बालमजुरीविषयी प्रबोधन करण्यास सुरूवात केली. वेठबिगारीविषयी सातत्याने माहिती देण्यात येत आहे. या मोहिमेदरम्यान महाराष्ट्र दिनी पथकाला बागलाण तालुक्यात कामावर असलेल्या दोन बालमजुरांविषयी माहिती मिळाली. ठेंगोडा शिवारात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेशद्वारानजीक एका शेतात शेळ्या, मेंढ्या चारण्याचे काम करणाऱ्या दोन बालकांची चाईल्ड हेल्पलाईन, जिल्हा महिला व बाल विकास विभाग यांच्या प्रतिनिधींच्या मदतीने सुटका केली.



# आंबेडकरी स्वकथने नव्या पिढीला दिशा देणारी : डॉ. आगलावे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. चापोलीकर यांच्या पिढीने जे भोगलं त्या अनुभवातून ते निर्भीडपणे पुढे गेले. त्यातून ते जीवनात उभे राहिले. आंबेडकरी स्वकथने नव्या पिढीला दिशा देणारी असतात. आजची परिस्थिती खूप चिंताजनक आहे. समतेच्या वाटेने जाणाऱ्या सर्वांना एकत्र आल्याशिवाय पर्याय उरला नाही, असे मत ज्येष्ठ विचारवंत डॉ.प्रदीप आगलावे यांनी व्यक्त केले. ते प्राचार्य डॉ. ज्ञानदेव दशरथ चापोलीकर लिखित आठवणींच्या हिंदोळ्यावर या आत्मकथनाच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी प्राचार्य डॉ. एम. ए. डॉ. वाहूळ, डॉ. सुरेश वाघमारे, भंते डॉ. सत्यपाल यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमांना वंदन करून झाले. "आठवणींच्या हिंदोळ्यावर" या आत्मकथनाचे प्रकाशन डॉ.प्रदीप आगलावे यांच्या हस्ते झाले. या वेळी ते म्हणाले की, " आंबेडकरी स्वकथानावर बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव आहे. ज्ञानाच्या शिक्षणाच्या क्रांतीमुळे शोषितांच्या जीवनात मोठा बदल झाला. डॉ. चापोलीकर यांचे हे आत्मकथन नवीन पिढीला निश्चितच दिशा देणारे ठरेल. ज्येष्ठ समीक्षक डॉ. प्रल्हाद लुलेकर या आत्मकथनावर भाष्य करताना म्हणाले, "ज्यांचा इतिहास लिहिला गेला नाही त्यांचा इतिहास आंबेडकरी विचारांच्या आत्मकथनाच्या रूपाने लिहिला गेला. बुद्धीप्रमाण्यवाद हा आत्मकथनाचा केंद्रबिंदू आहे. पत्नीच्या निधनानंतर चापोलीकर यांनी आपल्या तीनही मुलींना आईच्या ममतेने संस्कार दिले. सुशिक्षित केले, हे महत्त्वाची गोष्ट आहे. ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुरेश वाघमारे "आठवणींच्या हिंदोळ्यावर" भाष्य करताना म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव आत्मकथनावर आहे. आंबेडकरी आत्मकथने केवळ व्यक्तीची नसतात तर ती समाजाची प्रतिनिधिक स्वरूपाची असतात. डॉ. चापोलीकर यांनी आपल्या अनुभवाचे कथन अतिशय प्रांजळपणे केलं आहे. आठवणींच्या हिंदोळ्यावर"चे लेखक डॉ. चापोलीकर यांनी या आत्मकथन लेखानामागील उद्देश सांगिताना म्हटले की, "जीवनात खूप संकटे आली ; पण मी न खचता मार्गक्रमण करीत गेलो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी विचारातून बळ मिळत गेलं. जे कडुगोड अनुभव आले ते 'आठवणींच्या हिंदोळ्यावर' या आत्मकथनात मांडले. यावेळी डॉ. चापोलीकर यांच्या मुली विजया भालेराव, डॉ. अर्चना जोंधळे, डॉ. तृप्ती रोकडे यांनी चापोलीकर यांना मानपत्र दिले. तो मानपत्र वाचनाचा क्षण खूप भावुक ठरला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिवाजी डोळसे यांनी केलं. इंजि. विजया विजय भालेराव, माजी प्राचार्य डॉ. बी व्ही कांबळे, माजी उपप्राचार्य डॉ. रामदास झाकडे, माजी उपप्राचार्य डॉ. मधुकर खंदारे, डॉ. अर्चना अनिल जोंधळे, डॉ. तृप्ती मुक्ताच्छंद रोकडे, ना. तु. पोघे, प्रा. आर. एच. कांबळे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# आज अखंड हरिनाम सप्ताह आणि १०८ रामायण पाठ व मिरवणूक महाप्रसाद

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील देव्हारी येथील श्रीराम लक्ष्मण जानकी और श्री संत सेवालाल महाराज मुर्तीं प्राण प्रतिष्ठा हनुमान कळस स्थापित अखंड हरिनाम सप्ताह और १०८ रामायण पाठ दि.२६/४/२३ ते ५/५/२३ असा दहा दिवस चालणाऱ्या सोहळ्याचे महाप्रसाद करुन समारोप करण्यात आला. प. पु. श्री.संत नारायण स्वामी बापू यांच्या आशीर्वादाने ग्राम संसद देव्हारी श्री राम, लक्ष्मण, जानकी आणि संत सेवालाल महाराज यांची मुर्ती व अखंड हरिनाम सप्ताह १०८ रामायण पाठ आणि महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा आयोजक उत्तम महारु चव्हाण तंटामुक्ती अध्यक्ष, अनिल हरलाल वडते, राजवतीदेवी शिवचरणसिंह ठाकूर,विमलबाई आत्माराम चव्हाण नादांतांडा, आत्माराम मोरसिंग चव्हाण नांदातांडा व समस्त गावकरी मंडळी यांच्या वतीने ०५ मे २०२३ शुक्रवारी दुपारी दोन ते पाच पर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम होईल दि.२७/४/२३ ला भव्य शोभायात्रा केंद्रीय राज्यमंत्री ना रावसाहेब दानवे पाटील व ना गिरीशजी महाजन ग्रामविकासमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत सावळदबारा, टिटवी, डाभा, नादांतांडा व देव्हारी येथे काढण्यात आली होती. सदरील कार्यक्रमास धर्मगुरू बाबूसिंग महाराज पोहरादेवी, श्याम चैतन्य महाराज गुरुदेव सेवा आश्रम जामनेर, महंत परमहंस स्वामी रामभारतजी महाराज चांगेफळ, ह.भ.प.संदीप महाराज माऊली ऋषीगड आश्रम महाल्बदा,हभप योगेश महाराज मृदुंगाचार्य, गणेश महाराज मगर गायनाचार्य,रिकेश महाराज सातारकर गायनाचार्य यांच्या उपस्थितीत शंकर पार्वती विवाह सोहळा पार पडला.यावेळी डॉ रमेश केशव चव्हाण, डॉ. सुदाम चव्हाण, महेशसिंह ठाकूर, श्रीमती राजवती देवी ठाकूर, नरेंद्रसिंह ठाकूर, धनराज प्रताप चव्हाण, उत्तम महारु चव्हाण तंटामुक्ती अध्यक्ष, विठ्ठल हरलाल चव्हाण, देविदास मांगो राठोड, चुनीलाल सेवा चव्हाण, नेपाल ठाकूर, सुंदरबाई इंदल राठोड,प्रशराम पवार, थानसिंग नथ्थू राठोड,बिरेंद्र ठाकूर, प्रेमसिंग राठोड, संजय त्र्यंबक चव्हाण, ईश्वर महारु चव्हाण यांचे या कार्यक्रमास अनमोल सहकार्य लाभले आहे.२७ एप्रिल संत सेवालाल महाराज यांच्या मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कळशा रोहण सोहळा संपन्न झाला.तरी सोयगाव तालुक्यातील तांड्या, वस्त्या, देऊळगाव गुजरी, फत्तेपूर, जामनेर व सावळदबारा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी दहा दिवस चालणाऱ्या महाप्रसाद चा लाभ घ्यावा.सोहळ्याचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त रामभक्त मंडळ देव्हारी ता सोयगाव जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजक उत्तम महारु चव्हाण यांनी केले आहे.

# मंदिरातील दानपेटी चोरट्यांनी फोडली

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** तहसील पोलीस ठाण्याच्या भिंतीला लागून असलेल्या श्री केतेश्वर मंदिरातील दानपेटी चोरट्यांनी फोडली. त्यातून ५० ते ६० हजार रुपये चोरून नेले. हा सर्व प्रकार सुरू असतानाच पोलीस ठाण्यात जवळपास ३० ते ४० पोलीस कर्मचारी हजर होते. मात्र, ही चोरी एकाही पोलीस कर्मचाऱ्यांच्या लक्षात आली नाही. त्यावरून पोलीस कायदा सुरक्षेबाबत किती गंभीर आहे, हे दिसून येते. तहसील पोलीस ठाण्याच्या भिंतीला लागूनच श्री केतेश्वर मंदिर आहे. येथे भाविकांची मोठी गर्दी असते. त्यामुळे मंदिरातील दानपेटीत मोठी रक्कम जमा होत असते. हीच बाब हेरून चोरट्याने कट रचला. मात्र, पोलीस ठाण्याला लागून असलेल्या मंदिरात चोरी करणे म्हणजे खूपच जिकरीचे काम असल्याचे वाटत होते. तरीही बुधवारी मध्यरात्रीनंतर पोलिसांची गस्तप्रणाली बिघडल्यामुळे मंदिरातील दानपेटी चोरट्याने फोडली. दानपेटीतील रक्कम एका बॅगमध्ये भरली आणि पोलीस ठाण्यासमोरूनच निघून गेला. त्या चोरावर कुत्रे भुंकत होते. हा सर्व प्रकार ‘सीसीटीव्ही’मध्ये कैद झाला. गुरुवारी सकाळी सहा वाजता मनोहर पत्रेवार यांचा मुलगा मंदिरात गेला असता त्याला दानपेटी फुटलेली दिसली. त्याने वडिलांना माहिती दिली. पत्रेवार यांनी मंदिराचे विश्वस्त यांना माहिती देऊन तहसील पोलीस ठाण्यात तक्रार दिली. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून ‘सीसीटीव्ही’वरील फुटेजच्या आधारे चोरट्याचा शोध सुरू आहे, अशी प्रतिक्रिया तहसीलचे ठाणेदार अनिरुद्ध पुरी यांनी दिली.



# फुलंब्री बाजार समिती हमाली व तोलारी अपक्ष उमेदवार अझहर सय्यद यांची बाजी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी काल दिनांक 30 एप्रिल रोजी मतदान झाले. या निवडणुकीत भाजपा शिंदे गट विरुध्द महाविकास आघाडी सामना रंगला. या मध्ये भाजपा शिंदे गटाने कृषी उत्पन्न बाजार समिती वर बहुमताने जागा पटकावली. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसाठी 18 जागांपैकी 14 जागांवर बाजार समिती वर भाजपा – शिंदे गटावर निर्विवाद पहिल्यांदाच वर्चस्व प्रस्थापित केले. सन 2022 मध्ये प्रशासकीय राजवटीत तीन वेळा कॉंग्रेस चा सभापती तर एकावेळी शिवसेनेचा सभापती बसला होता. आता भाजपा चे आमदार हरिभाऊ बागडे व माजी आमदार डॉक्टर कल्याण काळे यांनी यांच्यात झालेल्या प्रतिष्ठेच्या लढाईत आमदार हरिभाऊ बागडे यांनी 18 जागांपैकी 14 जागांवर विजय मिळविला. तर कॉंग्रेसकडुन एका जागेवर समाधान व्यक्त केले. शिंदे गटाच्या शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र ठोंबरे यांनी वेगळे होत दोन जागा पटकावली तर हमाली व तोलारी मतदारसंघातुन अपक्ष म्हणून उमेदवार सय्यद अझहर यांनी बाजी मारली. यांना 718 पैकी 388 मतदान सय्यद अझहर यांना पडले विरोधी उमेदवार इलियास अब्दुल रहिम पटेल यांना 312 मतदान पडले.

# राजूर येथे पोलीस दलात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथे पोलीस दलात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला असून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यामध्येअमोल जगताप यांची अकोला ग्रामीण पोलीस पदी तर प्रथमेश दाभाडे यांची जिल्हा पोलीस नांदेड येथे नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल त्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. वरील दोनही विद्यार्थी सामान्य शेतकरी कुटुंबातील असून त्यांनी कठोर परिश्रमातू हे यश संपादन केले आहे. हसनाबद पोलीस ठाण्याच्या सहायक पोलिस निरीक्षक वैशाली पवार यांच्या हस्ते पोलीस दलात निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

ढिगळखेडा येथील सरपंच सुदाम ढवळे, राजूरचे माजी सरपंच भाऊसाहेब भुजंग, रुद्राणी फाऊंडेशनचे अध्यक्ष भीमाशंकर आप्पा दारुवाले, राष्ट्रवादीचे दत्तु आण्णा पुंगळे, प्रसिद्ध व्यापारी विठ्ठलराव टेपले, शिवा संघटना जिल्हाध्यक्ष कैलासआप्पा गबाळे,पत्रकार राम पारवे,पोलीस कर्माचारी सरडे साहेब, देशमुख साहेब, भागिले साहेब, वाघ साहेब, ग्रामपंचायत सदस्य सिन्नाथ ढवळे, पुंजाराम दाभाडे, विनोद तायडे, गजानन दाभाडे,आनंद तायडे, गंभीर ढवळे, ज्ञानेश्वर मिसळ, नितीन दाभाडे, राहुल साळवे यासह अनेकजण उपस्थित होते.



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर